
''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



# डोंगराई
## २०१७-१८

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली



'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०१८'

डोंगराई नियतकालिकास **हार्दिक शुभेच्छा !**

खंबीर नेतृत्व



**मा. आ. पृथ्वीराज देशमुख (बाबा)**

# केन ॲग्रो एनर्जी (इंडिया) लि.

मु. रायगांव, पो. हिंगणगांव बु।। ता. कडेगांव, जि. सांगली
फोन : ०२३४६-२४५१४८, २४५१४९, फॅक्स : ०२३४६-२४५१६६

**आमची ठळक वैशिष्ट्ये :**

- दररोज ३५०० मे. टन गळीत क्षमता.
- पांढरी शुभ्र व निर्यातक्षम दर्जेदार साखरेच्या निर्मितीत अग्रेसर
- चाचणी गळीत हंगामापासून सर्व विभाग संगणीकृत
- कडेगांव व खटाव तालुक्यातील दुष्काळी भागाचा कृषी-औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू
- कर्तव्यदक्ष संचालक मंडळ
- कार्यकुशल अधिकारी, सेवक वर्ग आणि प्रगतशील शेतकरी यांचा त्रिवेणी संगम
- टेंभू, ताकारी व उरमोडी उपसा सिंचन योजनांच्या माध्यमातून हरितक्रांतीकडे वाटचाल
- सांस्कृतिक कार्य, खेळाडू, गुणवंत विद्यार्थी, कलाकार कामगार यांना प्रोत्साहन आणि गुणवत्तेनुसार मदत.

**डॉ. जयकर रा. पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**माजी आ. पृथ्वीराज देशमुख (बाबा)**
चेअरमन

**व सर्व संचालक मंडळ**

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

ता. कडेगांव, जि. सांगली

# डोंगराई २०१७-१८

| अध्यक्ष |

**प्राचार्य एस्. टी. शिंगटे**

| संपादक |

**प्रा. बापूराव पवार**

## विभागीय संपादक

- प्रा. श्रीमती आंबवडे आर. जे. : इंग्रजी
- प्रा. एस्. पी. खोत : हिंदी
- प्रा. आर. एस्. लादे : मराठी

## जाहिरात विभाग

- प्रा. डॉ. एच. पी. शिर्के : प्रमुख
- सर्व स्टाफ : सदस्य

मुखपृष्ठ संकल्पना : प्रा. बी. बी. पवार

प्रकटन

भारत सरकारच्या १९५६ प्रेस ॲक्ट रजिस्ट्रेशन ऑफ बुक्सच्या कायद्यातील नियम क्र. ८ फॉर्म नं. ४ अन्वये आवश्यक माहिती –

| | | |
|---|---|---|
| ▪ प्रकाशन स्थळ | – | **आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली** |
| ▪ प्रकाशन काळ | – | **वार्षिक** |
| ▪ प्रकाशकाचे नांव | – | **प्राचार्य एस्. टी. शिंगटे** |
| ▪ राष्ट्रीयत्व | – | **भारतीय** |
| ▪ पत्ता | – | **आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली** |
| ▪ संपादक | – | **प्रा. बापूराव बी. पवार** |
| ▪ राष्ट्रीयत्व | – | **भारतीय** |
| ▪ पत्ता | – | **आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर ता. कडेगांव, जि. सांगली** |
| ▪ मुद्रकाचे नांव | – | **श्री. प्रकाश रामचंद्र नलवडे** |
| ▪ राष्ट्रीयत्व | – | **भारतीय** |
| ▪ मुद्रक | – | **सह्याद्रि ऑफसेट, कडेगांव** |
| ▪ पत्ता | – | **सह्याद्रि ऑफसेट, कडेगांव ता. कडेगांव, जि. सांगली** |

मी, प्राचार्य एस्. टी. शिंगटे या नियतकालिकाचा प्रकाशक या नात्याने जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहे.

स्थळ : **कडेपूर**

दिनांक : २६/०४/२०१८

**प्राचार्य एस्. टी. शिंगटे**



या नियतकालिकातील कविता, लेख, कथा व इतर साहित्य व मतप्रवाहांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. अंकातील साहित्यकृतीच्या स्वतंत्रतेची व अन्य जबाबदारी संबंधित लेखक व लेखिकांची आहे. या अंकातील मतांशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

(फक्त खाजगी वितरणाकरिता)

**संपादक**

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

**– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे**

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित**

# आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

**ता. कडेगांव, जि. सांगली**

## ध्येयधोरण

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार,
सत्य, शील, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग
या मौलिक निष्ठा जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करणे हा सुसंस्कारी शिक्षणचा हेतू राहील.
आचार, विचार आणि उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपूर्वक भर देणे.

### संस्थेची प्रार्थना

हरे राम हरे राम राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।।
राम कृष्ण रहीम ख्रिस्त बुध्द झरतुष्ट्र।
महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदुया चरण।
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग, पिळवणुकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्व दर्शन।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत।

**– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे**

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानिदेव वयुनानि विद्वान।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्तिम् विधेम्।

**– ईशावास्योपनिषद्**

### संस्थेची उद्दिष्टे

* संस्थेच्या शाळा व उपशाखांतून जात, धर्म, पंथ अथवा वर्ण भेदाभेद मानला जाणार नाही.
* संस्था राजकारणापासून अलिप्त राहील.
* जीवनात हरघडी साधेपणा व काटकसर यांची जपणूक संस्था करील.
* संस्थेच्या शाखांचे विशेष सर्वांना पाहण्यास खुले व उपलब्ध राहतील.
* सामान्य समाजाच्या सुसंस्कारी विकासाच्या ध्येयासाठी उत्स्फूर्तपणे वाहून घेणारे आदर्श समाजसेवक निर्माण करणे.
* प्राचीन काळातील गुरुपंरपरेला धरुन शिक्षक कार्यकर्त्यांच्या आदर्श जीवनाच्या धड्यातून नवीन शिक्षण पध्दती निर्माण केली जाईल. जिच्यामुळे आत्मसमर्पण, प्रामाणिकपणा, सत्य, समता, बंधुता या वृत्तीचा परिपोष केला जाईल. स्वतंत्र विचारवृत्ती आणि नवनिर्मिती यांची कुवत विकसित करणे. संस्थेचे देणे असल्यास आपण सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करतो याबद्दल कबुली जबाब देणे

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## व्यवस्थापक मंडळ सन (२०१५–२०१८

| | |
|---|---|
| मा. नामदार चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील | अध्यक्ष |
| मा. रघुनाथ मनोहर शेटे | उपाध्यक्ष |
| मा. संपतराव रामचंद्र जेधे | उपाध्यक्ष |
| मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | कार्याध्यक्ष |
| मा. डॉ. पुंडलिक नामदेव काळभोर | कार्याध्यक्ष |
| मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| मा. पुंडलिक शामराव चव्हाण | सहसचिव प्रशासन |
| मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सहसचिव अर्थ |
| मा. रवींद्र रामचंद्र चव्हाण | सदस्य |
| मा. अविनाश दिनकर पाटील | सदस्य |
| मा. संपत बंडू मोरे | सदस्य |
| मा. सदाशिव कृष्णा कुंभार | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. युवराज अंबादास भोसले | सदस्य |
| मा. सिताराम महारू गवळी | सदस्य |
| मा. श्रीराम शरदचंद्र साळुंखे | सदस्य |
| मा. अविनाश नामदेव कदम | सदस्य |
| मा. कृष्णा गणपती बिसले | सदस्य |

## आजीव सेवक मंडळ

| | |
|---|---|
| मा. डॉ. युवराज अंबादास भोसले | अध्यक्ष |
| मा. पुंडलिक शामराव चव्हाण | सेक्रेटरी |
| मा. प्रा. सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सदस्या |
| मा. डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सदस्य |
| मा. सीताराम महारु गवळी | सदस्य |
| मा. भाऊसाहेब नानासाहेब सांगळे | सदस्य |
| मा. कृष्णा गणपती बिसले | सदस्य |
| मा. डॉ. अशोक आबा करांडे | सदस्य |
| मा. मारुती निवृत्ती सोनवणे | सदस्य |
| मा. सखाराम सत्याप्पा कांबळे | सदस्य |
| मा. बाळासाहेब निवृत्ती माळी | सदस्य |
| मा. डॉ. सिताराम यल्लूपा होनगेकर | सदस्य |
| मा. विष्णू सुबराव पाटील | सदस्य |
| मा. शशिकांत यशवंत काटे | सदस्य |

## विश्वस्त मंडळ

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | अध्यक्ष |
| मा. प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सहसचिव अर्थ |

## महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे | अध्यक्ष |
| मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | सचिव, व्यवस्थापन मंडळ |
| प्रा. बी. बी. पवार | सदस्य विभागप्रमुख (प्राचार्य नियुक्त) |
| प्रा. डॉ. एच. पी. शिर्के | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| प्रा. डी. ए. होनमाने | सदस्य (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| प्रा. श्रीमती एस्. वाय. पाटील | सदस्या, (प्राध्यापक प्रतिनिधी) |
| श्री. आर. डी. पवार | सदस्य (शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी) |
| मा. लालासाहेब यादव (आबा) | सदस्य (सामाजिक क्षेत्र) |
| मा. बबनराव यादव (भाऊसाहेब) | सदस्य (संशोधन क्षेत्र) |
| मा. पृथ्वीराज देशमुख (बाबा) | सदस्य (शिक्षण क्षेत्र) |
| मा. संग्रामसिंह देशमुख (भाऊ) | सदस्य (औद्योगिक क्षेत्र) |
| प्रा. जी. आर. बागवान | सदस्य (समन्वयक IQAC) |
| रिक्त | सदस्य (अध्यक्ष, विद्यार्थी संसद) |
| श्री. शैलेश यादव | सदस्य (सचिव, विद्यार्थी संसद) |
| प्राचार्य एस्. टी. शिंगटे | पदसिध्द सचिव |

महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू–भगिनींचे

प्रियजन–नातेवाईक, संस्था पदाधिकारी, गुरुदेव कार्यकर्ते,

कर्मचारी व त्यांचे नातेवाईक,

समाजातील साहित्यिक, समाज धुरंधर,

राजकारणी, खेळाडू, संगीततज्ञ, शास्त्रज्ञ व कलावंत

यांच्यापैकी जे अनंतात विलीन झाले,

अपघात, दहशदतवादी हल्ले व

नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक ज्ञात–अज्ञात बंधू–भिगिनी,

बालके स्वर्गवासी झाली

या सर्वांना डोंगराईच्यावतीने

# भावपूर्ण श्रध्दांजली..!



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# प्राध्यापक वृंद

## मराठी विभाग

| | |
|---|---|
| श्री. बी. बी. पवार | सहाय्यक प्राध्यापक |
| श्री. आर. एस्. लादे | सी. एच. बी. |
| कु. आर. जी. रेळेकर | सी. एच. बी. |

## हिंदी विभाग

| | |
|---|---|
| सौ. ए. ए. हावळे | सहयोगी प्राध्यापक |
| श्री. एस्. पी. खोत | सी. एच. बी. |
| श्री. एस्. व्ही. डुरे | सी. एच. बी. |
| श्री. एस्. के. पाटील | सी. एच. बी. |

## इंग्रजी विभाग

| | |
|---|---|
| प्राचार्य एस्. टी. शिंगटे | |
| श्री. जी. आर. बागवान | सहाय्यक प्राध्यापक |
| सौ. एस्. एस्. घाटगे | सी. एच. बी. |
| श्रीमती आर. जे. आंबवडे | सी. एच. बी. |
| कु. एस्. जी. पवार | सी. एच. बी. |
| श्री. एस्. ए. उथळे | सी. एच. बी. |

## अर्थशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| श्री. आय. बी. आहिरे | सहयोगी प्राध्यापक |
| श्री. डी. ए. होनमाने | सहयोगी प्राध्यापक |
| डॉ. एन. डी. गवळी | सी. एच. बी. |
| डॉ. एस्. एस्. व्यवहारे | सी. एच. बी. |
| कु. व्ही. टी. शिंदे | सी. एच. बी. |

## इतिहास विभाग

| | |
|---|---|
| श्री. आर. पी. महानवर | सहाय्यक प्राध्यापक |
| श्रीमती एस्. बी. इंगवले | सहाय्यक प्राध्यापक |

## समाजशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| श्रीमती एस्. वाय. पाटील | सहाय्यक प्राध्यापक |

## राज्यशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| श्री. व्ही. ए. पाटील | सहयोगी प्राध्यापक |

## भूगोल विभाग

| | |
|---|---|
| श्री. के. एम. माने | सहयोगी प्राध्यापक |

## वाणिज्य विभाग

| | |
|---|---|
| डॉ. एच. पी. शिर्के | सहयोगी प्राध्यापक |
| श्री. एस्. एम. वनभट्टी | अर्धवेळ प्राध्यापक |
| सौ. ए. व्ही. सावंत | सी. एच. बी. |
| श्री. ए. एल. शिंदे | सी. एच. बी. |
| कु. पी. बी. होनमाने | सी. एच. बी. |
| श्री. एस्. एस्. तावडे | सी. एच. बी. |

## शारीरिक शिक्षण विभाग

| | |
|---|---|
| श्री. एस्. डी. झिटे | सी. एच. बी. |

## पर्यावरण विभाग

| | |
|---|---|
| श्री. एस्. पी. खोत | सी. एच. बी. |

## ग्रंथालय विभाग

| | |
|---|---|
| श्रीमती एन. आर. थोरात | सी. एच. बी. |

## शिक्षकेत्तर कर्मचारी

| | |
|---|---|
| श्री. आर. डी. पवार | मुख्य लिपिक |
| श्री. एस्. ए. लोखंडे | वरिष्ठ लिपिक |
| श्री. डी. एस्. भोंगाळे | ग्रंथालय परिचर |
| श्री. एस्. जी. माने | शिपाई |

## Principal's Foreword...



It is an ecstatic feeling to put across a few words in the magazine "Dongarai" brought out by the students of Arts and Commerce College, Kadepur. This magazine has given an opportunity to the students to express their hidden ambitions, their goals, and their aspiration. We are proud enough to be in the spiritual region where the blessings of the great goddess Dongrai are prevalent.

This year, the management committee has set before the task of bringing out in itself the glory of the latent talents of the students of our college that are normally buried under the weight of examinations, rigid academic schedules and lectures. The central theme of this magazine issue seems to revolve on varied aspects of the students' life, his sense of duty, his capacity for had work and his swelling emotions all of which seem to alternate in the pulsating rhythm of his existence contributing to the ultimate triumph of his spirit.

It is a great pleasure and bounty for me to be the witness to this auspicious day and moments of joy and happiness to see the growth a dream turning into reality to see that a seed has grown to a tender plant and has spread its roots in the society and its shadow and fruits are utilized by thousands of people.

It is a great pleasure to see the intellectual and spiritual growth of the students. How fortunate I am to be the whiteness to all these moments! I sincerely thank my dear faculty and students without whose efforts, dedication and sincerity we would not have been the witensses. I admire and appreciate the assistance rendered from time to time by the dear parents and well-wishers without whose assistance the college would not have had such a rapid and speedy progress.

This magazine will be a guiding force for the students that enter the portals of our institute and also others who have access to it. I wish every student success in his endeavour and I am sure that the students of the college will look forward to this issue which promises to be the best published even during the years to come.

My beloved students get unceasing inspiration & energy from the beaconilike local personalities like Mr. Lalasaheb (Aba) Yadav, Mr. Babanrao (Bhausaheb) Yadav, Mr. Sangramsingh (Bhau) Deshmukh & Mr. Prithviraj (Baba) Deshmukh and many others whose help is always inimitable & words are of little help to say what they do for this college.


I have all my best wishes to my dear students who have left the college for further education and my best wishes to all the students who are the source of inspiration and sucess for the college and me. I hope my dear students will keep the value of what has been taught to them in the college and practise the virtues and morality in their lives and remain as examples in their societies and practise peace and create love and unity among the people wherever they are and engage their minds and energy to serve mankind and this very theme and thinking we have been practising as the ideas of the founder of our institute, Dr. Bapuji Salunkhe and Prin. Abhakumarji Salunkhe, the president of our beloved management.

No doubts, my institute is grateful to Prin. Abhaykumarji for his libido, patronage and beacon like position towards it.

While congratulating the editorial board for their efforts and dedication for bringing out such a high level of latent literary talent in a record time, I express my best wishes to these stalwart supporters of peace and harmony in the region.

**Prof. S. T. Shingate**
Principal

।।ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार।।



# शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

संकल्पक संस्थापक **'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,' कोल्हापूर**

जन्म : ९ जून १९१९

महानिर्वाण : ८ ऑगस्ट १९८७

## आमचे श्रध्दास्थान



संस्थामाता

# सुशिलादेवी साळुंखे

## संस्था पदाधिकारी

अध्यक्ष



मा. ना. चंद्रकांतदादा पाटील

कार्याध्यक्ष



मा. प्राचार्य
अभयकुमार साळुंखे

उपाध्यक्ष



मा. रघुनाथ मनोहर शेटे

## संस्था पदाधिकारी

संस्था सचिव



मा. प्राचार्या
सौ. शुभांगी गावडे

सहसचिव (अर्थ)



मा. प्राचार्य
डॉ. राजेंद्र शेजवळ


सहसचिव (प्रशासन)



मा. प्राचार्य
पुंडलिक चव्हाण



मा. डॉ. देवानंद शिंदे
कुलगूरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे

## विद्यार्थी मंडळ २०१७-१८



**शैलेश अरुण यादव**
सचिव, विद्यार्थी मंडळ



**शुभम अशोक वाघमारे**
वर्गप्रतिनिधी,बी.ए.भाग१



**कु. पुजा दऱ्याप्पा जमदाडे**
वर्गप्रतिनिधी,बी.ए.भाग२



**कु. सुप्रिया सुरेश मोहिते**
वर्गप्रतिनिधी,बी.ए.भाग३



**आकाश रावसाहेब यादव**
वर्गप्रतिनिधी,बी.कॉम.भाग१



**सचिन दिलीप भारती**
वर्गप्रतिनिधी,बी.कॉम.भाग२



**कु. करुणा सुभाष सुतार**
वर्गप्रतिनिधी,बी.कॉम.भाग३



**अमोल युवराज कोळेकर**
सदस्य,एन.एस.एस.



**कु. रुपाली शिवाजी यादव**
सदस्य,प्राचार्य नियुक्त विद्यार्थिनी प्रतिनिधी



**कु. मयुरी श्रीधर गवाळे**
सदस्य,प्राचार्य नियुक्त विद्यार्थिनी प्रतिनिधी मागासवर्गीय

## 'डोंगराई' संपादक मंडळ

### प्रमुख संपादक



**प्रा. बापूराव बी. पवार**

### विभागीय संपादक

**मराठी विभाग**



**प्रा. आर. एस्. लादे**

**हिंदी विभाग**



**प्रा. एस्. पी. खोत**

**इंग्रजी विभाग**



**प्रा. श्रीमती आर. जे. आंबवडे**

# महाविद्यालय क्षणचित्रे



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष
मा. संग्रामसिंह देशमुख (भाऊ) यांचे स्वागत करताना
महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे व इतर मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे
माजी प्राचार्य बी. बी. सावंत यांचे स्वागत करताना
मा. संग्रामसिंह देशमुख (भाऊ) व इतर मान्यवर



वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मा. लालासाहेब यादव (आबा),
मा. बबनराव यादव (भाऊसाहेब),
मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे व मा. ॲड. सत्यजित देशमुख (भैय्या)



वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना
मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे व उपस्थित मा. लालासाहेब यादव (आबा),
मा. बबनराव यादव (भाऊसाहेब),व मा. ॲड. सत्यजित देशमुख (भैय्या)



महाविद्यालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे
प्रमाणपत्र स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य
एस्. टी. शिंगटे व डॉक्टर व इतर मान्यवर



वृक्षारोपण करताना मा. बबनराव यादव (भाऊसाहेब),
मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे, मा. लालासाहेब यादव (आबा),
व उपस्थित  इतर मान्यवर

# महाविद्यालय क्षणचित्रे



वृक्षारोपण करताना मा. लालासाहेब यादव (आबा), मा. बबनराव यादव (भाऊसाहेब), मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे, व उपस्थित इतर मान्यवर



विवेकानंद सप्ताहानिमित्त अभिवादन करताना महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री. आर. डी. पवार, प्रा. के. एम. माने व प्रा. डी. ए. होनमाने



विवेकानंद सप्ताहानिमित्त क्रीडा ज्योत घेऊन आलेले महाविद्यालयातील खेळाडू व उपस्थित प्राध्यापक वृंद



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी उपस्थित कडेपूर गावचे उपसरपंच मा. संग्राम मोहन यादव यांचे स्वागत करताना मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे व इतर मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचा विद्यार्थी संसद सचिव श्री. शैलेश यादव याचा सत्कार करताना मा. संग्रामसिंह देशमुख (भाऊ) मा. सरपंच सौ. रुपाली उदयसिंह यादव व इतर मान्यवर



महाविद्यालयातील भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे व प्राध्यापक वृंद

# महाविद्यालय क्षणचित्रे



वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना मा. बबनराव यादव (भाऊसाहेब), मा. लालासाहेब यादव (आबा), मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे, व उपस्थित इतर मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी प्रतिमा पूजन करताना मा. संग्रामसिंह देशमुख (भाऊ), प्राचार्य बी. बी. सावंत व सरपंच सौ. रुपाली उदयसिंह यादव व इतर मान्यवर



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शनात ग्रंथ पाहणी करताना प्राचार्य एस्. टी. शिंगटे, डॉ. एच. पी. शिर्के व प्राध्यापक वृंद



आग्रणी महाविद्यालय कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना प्रमुख पाहुणे प्रा. किरण पाटील, प्राचार्य एस्. टी. शिंगटे व प्राध्यापक वृंद



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित बुध्दीबळ स्पर्धेत सहभागी खेळाडू



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडू

# आग्रणी महाविद्यालय कार्यशाळा




पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा. प्रा. किरण पाटील व उपस्थित प्राचार्य एस्. टी. शिंगटे, डॉ. दशरथ देवशिंगे व डॉ. एच. पी. शिर्के



पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य एस्. टी. शिंगटे प्रसंगी उपस्थित मा. प्रा. किरण पाटील , डॉ. दशरथ देवशिंगे व डॉ. एच. पी. शिर्के




पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत प्रास्ताविक करताना जिमखाना प्रमुख प्रा. सुरज झिटे व उपस्थित मा. प्रा. किरण पाटील प्राचार्य एस्. टी. शिंगटे, डॉ. दशरथ देवशिंगे व डॉ. एच. पी. शिर्के



पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत गोळाफेक प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी



पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत लांब उडीचे प्रात्यक्षिक दाखवताना प्रा. डॉ. दशरथ देवशिंगे व विद्यार्थी-विद्यार्थिनी



पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळेत शारीरिक क्षमता चाचणी चे मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. दशरथ देवशिंगे व विद्यार्थी-विद्यार्थिनी

# राष्ट्रीय सेवा योजना




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
मा. लालासाहेब यादव (आबा) व उपस्थित कार्यक्रमाधिकारी
प्रा. बी. बी. पवार,मा. बबनराव यादव (भाऊसाहेब), मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे



राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित ''आपत्ती निवारण जनजागृती''
विषयी व्याख्यान देताना मा. प्रा. के. एम. माने व उपस्थित कार्यक्रमाधिकारी
प्रा. बी. बी. पवार, प्राचार्य एस्. टी. शिंगटे व डॉ. एच. पी. शिर्के



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित श्रमदान
कार्यक्रमात सहभागी
कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. पवार व स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित
आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग करताना
प्राचार्य एस्. टी. शिंगटे, डॉ. एच. पी. शिर्के व प्राध्यापक वृंद



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित रक्तदान कार्यक्रम प्रसंगी
उपस्थित प्राचार्य एस्. टी. शिंगटे, कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. पवार,
प्रा. आर. पी. महानवर, प्रा. एस. वाय. पाटील व स्वयंसेवक




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार
शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी
प्रा. बी. बी. पवार व उपस्थित प्राचार्य एस्. टी. शिंगटे, अपशिंगे गावच्या
सरपंच मा. सौ. शुभांगी आनंदा सुर्यवंशी व इतर मान्यवर

# राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात योग करताना सहभागी स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात मौजे अपशिंगे येथे स्मशानभूमी स्वच्छता करताना स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना ग्राहक मंचाचे सदस्य मा. दत्ता मोहिते व उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी अहवाल सादर करताना प्रा. बी. बी. पवार व उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा. पुंडलिक चव्हाण सहसचिव (प्रशासन), श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर व इतर मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा. विजयकुमार धायगुडे, नायब तहसिलदार, कडेगांव व उपस्थित प्राचार्य एस्. टी. शिंगटे, सरपंच सौ. शुभांगी सुर्यवंशी व इतर मान्यवर

# क्रीडा विभाग



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे प्रसंगी उपस्थित जिमखाना प्रमुख प्रा. सुरज झिटे, प्राध्यापक वृंद व सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी




विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेत खेळाडूंची ओळख करुन घेताना मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे, प्रा. डी. ए. होनमाने, जिमखाना प्रमुख प्रा. सुरज झिटे व सहभागी खेळाडू



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळताना महाविद्यालयाचे खेळाडू



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेत व्हॉली बॉल खेळताना महाविद्यालयाचे खेळाडू



विवेकानंद सप्ताहानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेत भाला फेक करताना महाविद्यालयाचे खेळाडू



क्रीडा विभागाच्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे, जिमखाना प्रमुख प्रा. सुरज झिटे व प्राध्यापक वृंद

# संपादकीय



## ''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करुन शैक्षणिक वर्ष २०१७–१८ चा महाविद्यालयाचा वार्षिक अंक **'डोंगराई'** आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहेत.

शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये विविध उपक्रम राबवले. त्यातीलच एक महत्वपूर्ण उपक्रम म्हणजे **'डोंगराई'** या अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील विचारांना मोकळेपणाने व्यक्त होण्यास पुर्णपणे वाव दिला आहे.

मनात विचार पूर्ण झाल्यावर जसे शब्द असोशीने बाहेर येतात तशाच सहजतेतून या अंकातील सर्व साहित्य विद्यार्थ्यांनी लेखनीबध्द केले आहे. या अंकातील साहित्य हे वैविध्यपूर्ण आहे. तसेच लेखनासाठी वापरलेली भाषा ही अतिशय साधी–सोपी दररोजच्या व्यवहारातील आहे. बदलत्या वास्तवाला अनुसरुन विद्यार्थ्यांनी लेखन केले आहे. विद्यार्थ्यांनी लिहलेल्या साहित्यात थोडीफार अपरीपक्वता असेल परंतू प्रांजळ उत्स्फुर्तता असल्याने हे साहित्य महत्वाचे आहे. नवोदित लेखकांसाठी **'डोंगराई'** म्हणजे हक्काचे व्यासपीठच आहे.

विद्यार्थ्यांच्या साहित्याबरोबरच या अंकात महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम वेगवेगळ्या विभागाच्या अहवालाच्या माध्यमातून आपणासमोर ठेवले आहेत तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी विविध उपक्रमात सहभागी होऊन केलेल्या कार्याचीही ओळख आपणास या अंकाच्या माध्यमांतून होईल. हे महाविद्यालय कोठेही कमी असलेले दिसत नाही.

मानवी आरोग्यासाठी तृणधान्ये ही अत्यंत आवश्यक असतात. याचे महत्व लक्षात घेऊन तसेच सामान्य शेतकऱ्याच्या गरजा लक्षात घेऊन भारत सरकारच्यां कृषी मंत्रालयाने २०१८ हे वर्ष 'राष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून आणि संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे करण्याचे ठरविले आहे. या पार्श्वभूमीवर

या वार्षिक अंकाचे मुखपृष्ठ तयार करण्यात आले आहे.

हा अंक प्रकाशित करण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे तसेच संस्थेच्या सचिव मा. शुभांगी गावडे मॅडम यांचे आशीर्वाद व महाविद्यालाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांचे मार्गदर्शन लाभले या अंकाचे काम करणारे माझे सहकारी प्रा. श्रीमती आर. जे. आबंवडे व प्रा. एस्. पी. खोत, प्रा. आर. एस्. लादे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिंनी, जाहिरातदार इत्यादिंच्या सहकार्यातून हा अंक प्रकाशित झाला. तसेच हा अंक वेळेत प्रकाशित कणारे सह्याद्रि ऑफसेटचे मा. प्रकाश नलवडे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले या सर्वांचे मन:पुर्वक आभार

ठिकाण : कडेपूर

**प्रा. बापूराव बी. पवार**
प्रमुख संपादक

# मराठी विभाग

आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही
म्हणून श्रीकाराच्या नंतर शिकणे अ, आ, ई
मुलांनो शिकणे अ, आ, ई

तीच वाढवी ती सांभाळी
ती करी सेवा तीन त्रिकाळी
देवानंतर नमवी मस्तक आईच्या पायी

कौसल्येविण राम न झाला
देवकीपोटी कृष्ण जन्मला
शिवरायाचे चरित्र घडवी माय जिजाबाई

नकोस विसरू ऋण आईचे
स्वरूप माउली पुण्याईचे
थोर पुरुष तू ठरून तियेचा होई उतराई

**– ग. दि. माडगूळकर**

विभागीय सहसंपादक
**प्रा. आर. एस्. लादे**

# अनुक्रमणिका

## (गद्य विभाग)


| | |
|---|---|
| १) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार | विकास मोहिते |
| २) लक्षात नसलेला बाप | कु. शितल थोरात |
| ३) जीवन | अक्षय यादव |


## (पद्य विभाग)


| | |
|---|---|
| १) शब्द | विकास मोहिते |
| २) प्रेमाचं क्रिकेट | अक्षय खैरमोडे |
| ३) ममता | कु. मयुरी शेवाळे |
| ४) मानणसे जोडा | कु. सुप्रिया भंडारी |
| ५) प्रेम कुणावर करावे | अनिरुध्द शिंदे |
| ६) असचं... | शुभम चव्हाण |
| ७) आवडलं मला | अमोल कोळेकर |
| ८) मैत्रिण | कु. तेजस्वी गुरव |
| ९) जीवन | सागर चव्हाण |
| १०) मैत्री | कु. भारती वायदंडे |
| ११) तुझ्याविषयी लिहताना | कु. क्रांती कांबळे |
| १२) तुझ्यासोबत जगायचंय | सोमनाथ सुर्यवंशी |
| १३) ध्येय | कु. प्रमिला पाटोळे |
| १४) हा न्याय कसला | कु. प्रमिला पाटोळे |
| १५) सोबत | सुहास माने |
| १६) आई | कु. राजश्री करांडे |
| १७) जीवन सार | कु. मयुरी गवाळे |

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार

१५ ऑगस्ट १९४७ या मंगल दिवशी भारत स्वतंत्र झाला. शतकाहून अधिक काळाची गुलामी नष्ट झाली. स्वातंत्र्य म्हणजे राष्ट्राचा प्राणवायू ! या प्राणवायूशिवाय राष्ट्र जगणार कसं ? तगणार कसं? वाढणार कसं? फुलणार कसं? स्वातंत्र्याच दुसरे नाव आहे विकास ! स्वातंत्र्याशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकासही संभवत नाही. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्याचं महंन्मंगल स्त्रोत गाताना म्हटलं आहे.

''जयोस्तुते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभ दे ।
स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे ।।
तुजसाठी मरण ते जनन
तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण...
श्री स्वतंत्रते, श्री स्वतंत्रते, श्री स्वतंत्रे !..''

या परममंगल भगवती स्वतंत्रतेच्या उदयासाठी अनेक क्रांतिवीरांनी, बहादुरांनी अनेकानेक तऱ्हेने परसत्तेशी झुंज घेतली, कारावास, अज्ञातवास, देहदंड भोगले. वधस्तंभावर लटकले. प्राणांची आहुती दिली... त्यागाची परिसीमा गाठली.

''युगा-युगांमधुन कधी तरी आकाश थरथरते ! कधी धर्म संस्थापनार्थ संभवामि युगे-युगे म्हणणाऱ्या श्री कृष्णाच्या रुपाने, तर कधी गोरगरीबांच्या शिक्षणासाठी आपले औदार्य उधळणाऱ्या शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या रुपाने.

मानवाच्या निर्मितीचा उत्कांतिवाद हा आता सर्वसाधारण सर्वमान्य झालेला सिद्धांत आहे. आपली निर्मिती झाल्यानंतर मानवाने आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर निसर्गनियमांच्या सतत शोध घेत त्याची गुपिते हुडकून काढण्याचा जो सपाटा लावला, तसेच निसर्ग-नियमांना आपल्या काबूत आणून आपल जीवन अधिकाधिक सुसह्य करण्याचा जो प्रयत्न केला, त्यातच त्याचं सर्वाधिक यश आहे. जशी शोधाच्या दुनियेतली त्याची मुलुखगिरी चालूच आहे, तशीच निसर्गाच्या खजिन्यातील गुपित फोडही सुरुच आहे. अजूनही अनेक गुपितांच्या किल्ल्या त्याच्या हाती आलेल्या नाहीत, पण त्या आज ना उद्या आपल्या हाती येतील असा त्यांचा दुर्दम्य आशावाद आहे.

साहस, विचारक्षमता आणि कृतिशीलता या तीन गुणांच्या सहाय्याने त्याने आपलं स्वतःचे जीवन आरपार बदलून टाकल आहे. तसंच अन्य प्राण्यांवर आपली हुकमतही बसवली आहे. निसर्गावर थोडफार नियंत्रण ठेवण्यात यश मिळवलं आहे. अज्ञाताचा शोध ही मानवी प्रवृत्ती बनली. त्याचबरोबर व्यक्तिगत समृद्धीबरोबर सामुहिक, सामाजिक समृद्धी झाल्याशिवाय शांतता लाभणार नाही, याचा ध्यास त्याला लागला. त्यातून दया, क्षमा, शांती, सत्य आदी मूलभूत गुणांबाबतचे त्याचं आकर्षण वाढले त्यातून नैतिकतेचा जन्म झाला. आणि संस्कृतीची संकल्पना उदयाला आली. त्याची वैचारिक वाढ होऊ लागली. तसतशी सामाजिक न्यायाची त्याची कल्पना बदलत गेली आणि

त्याचबरोबर जुन्या मूल्यांचं अपुरेपण त्याच्या ध्यानात येत राहिलं. पूर्वी जपलेली काही मुल्य टाकाऊ ठरावित असं त्याला वाटू लागले.

जुन्या मुल्यांची अपूर्णता जाणण्यात नव्या मुल्यांच्या निर्माणाची बीजं असतात हेही त्याच्या ध्यानात आलं. जुन्या मुल्यांचा त्याग करणं आणि नवीन मुल्याचं निर्माण करण हाच आधुनिकतेकडे प्रवास असतो. रानटीपणावर मात करत इतरांचाही भल्याचा विचार करत निसर्गाचा समतोल बिघडू न देता आपलं आधिकाधिक हित साधण्यात तसेच प्रयत्न हा आधुनिकतेचा प्रवास कधीही थांबत नाही. विज्ञान आणि तत्वज्ञान यांचा फरक सांगत प्लेटोनं म्हटले होते – ज्यांचा ज्ञानप्रसारकाचा व्यवसाय आहे, ज्यांना सेफिस्ट म्हटले जाते आणि ज्यांच्या ज्ञानदानातील कौशल्याचा सारेच हेवा करतात ते जनसामान्यांपर्यंत प्रचलित असे रुढ विचारच रुजवत असतात त्यालाच ते विज्ञान म्हणतात.

'न मनुष्यात श्रेष्ठतंर हि कश्चित' खरेच प्राणीमात्रामध्ये मानव श्रेष्ठ आहे. त्याचे हे श्रेष्ठत्व त्याच्या गुणांवर व कर्तृत्वावर अवलंबून असते. जो सरस्वतीची उपासना करुन ज्ञानसंवर्धन व ज्ञानदान करतो तो आपले ध्येय निश्चित करुन त्याच्याशी एकनिष्ठ राहतो व कार्यप्रणव होतो. जो प्रतिकूलतेतून अनुकुलतेचा मार्ग शोधतो, जो तपस्या आणि साधन त्यांच्या बळावर आपले अंगीकृत कार्य नियमाने नि नेटाने करतो, जो आपला वैयक्तिक स्वार्थ सोडून समाजाच्या कल्याणासाठी अधिक झटतो, जो मानवतेचा नि समतेचा पुरस्कार आपल्या कार्यातून करतो, तोच खरा महापुरुष, महामानव, नररत्न.

भारत म्हणजे नररत्नांची खाण. तपस्यांची तपोभूमी. कर्मयोग्यांची कर्मभूमी; पण अगदी थोडीच माणसे तपस्वी, कर्मयोगी अथवा नररत्ने होतात. कार्यक्षेत्रात शैक्षणिक क्षेत्र हे अग्रगण्य आहे. शिक्षणाच्या भक्कम आणि मजबूत पायावरच मानवाच्या यशाचे भव्य मंदिर उभे राहते आधुनिक काळात शिक्षणाच्या ज्ञानयज्ञात महाराष्ट्रातील अनेक शिक्षणप्रेमी व समाज सुधारक धुरंधरांनी आपले सर्वस्व अर्पण केले आहे. महात्मा जोतीराव फुले, छत्रपती राजर्षी शाहू, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो कर्वे, श्रीमान सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी नररत्नांच्या मालिकेतील एक नररत्न म्हणजे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक व कार्याध्यक्ष शिक्षणमहर्षी परमपूज्य बापूजी साळुंखे. 'ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते. त्या ज्ञानाचे मंदिर हे सत्य शिवाहून सुंदर हे।'

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर या गावी दि. ९ जून १९१९ या दिवशी बापूजींचा जन्म झाला. १९१९ हे वर्षच संस्मरणीय आहे. याच वर्षी मॉटेग्यूचेम्सफर्ड सुधारणा कायदा पास होऊन भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीचा मार्ग काहीसा मोकळा झाला. याच वर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि याच वर्षी बापूजींचा जन्म झाला.

गोविंदराव ज्ञानोजीराव साळुंखे हे त्यांचे मूळ नाव. परंतू महात्मा गांधींच्या साधी राहणी व उच्च शिक्षण या ध्येयाचे त्यांचे आचरण, आणि उच्च विचारसरणी असल्याने ते सर्वांचे 'बापूजी' झाले. बापूजींचे बालपण अत्यंत गरीबीत गेले आणि या गरीबीतच त्यांनी आपले शिक्षण संपादन केले. संस्कृत व मराठी हे त्यांचे आवडते विषय होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण इस्लामपूरला झाले. कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. ते १९४५ मध्ये बी. ए. १९४९ मध्ये बी. टी. झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांचा विवाह दि. १५ डिसेंबर १९४७ रोजी संपन्न झाला.

पू. बापूजींचे जीवन, शिक्षण व संस्कार यातूनच त्यांचे सामाजिक राष्ट्रीय व शैक्षणिक कार्य साकारले आहे. बापूजींनी आपल्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ आपल्या विद्यार्थी दशेतच रोवली. शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार व प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब यांचे ते प्रिय विद्यार्थी होते. त्यांच्या आदेशावरुन त्यांनी सोंडूर येथील घोरपडे राजघराण्याच्या इतिहासासंबंधीच्या कागदपत्राचे संशोधन केले. या संशोधनाबरोबरच सोंडूरचे महाराज यशवंतराव घोरपडे यांनी आपल्या पुत्रांना शिक्षण देण्यासाठी बापूजींची 'राजगुरु' म्हणून नियुक्ती केली. हे काम त्यांनी दोन वर्षे केले.

सोंडूरला राजगुरु म्हणून ज्ञानदानाचे कार्य करीत असतानाच महात्मा गांधींच्या १९४२ च्या क्रांतीलढ्यात बापूजींनी उडी मारली. सातारा, सांगली व बेळगाव जिल्ह्यात त्यांनी भूमीगत आंदोलनात काम केले. शिवाय स्वातंत्र्य सैनिकाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन सातारा जिल्ह्यातील क्रांतीवीरांचा वस्तुनिष्ठ व उद्‌बोधक असा त्रोटक इतिहास लिहला. बापूजी सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसचे प्रमुख होते. सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसमध्ये असतानाच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याकडे आकर्षित झाले व कर्मवीर भाऊराव पाटील गौरव समितीचे अध्यक्ष झाले. हा गौरव निधी गोळा करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

१९४५ ते १९५५ या कालावधित बापूजींनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास वाहून घेतले. रयत शिक्षण संस्थेच्या 'रुकडी' येथील गांधी विद्यालयाच्या स्थापनेत व प्रगतीत त्यांचा अमोल वाटा आहे. कालांतराने काही तात्विक मतभेदामुळे बापूजी १९५५ मध्ये रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडले.

महात्मा जोतिराव फुले यांनी 'अखंड' मध्ये असे सुचवले आहे की,

''विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।

नितीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।

वित्ताविना शुद्र खचले। इतका अनर्थ एका अविद्येने केला।।''

दि. १९ ऑक्टोंबर १९५४ या दिवशी बापूजींनी कराड येथील योगेश्वर भगवान मुरलीधर मंदिरात नवीन शिक्षण संस्था स्थापनेचा संकल्प आपल्या सहकार्यासमोर सोडला. १ नोव्हेंबर १९५४ या दिवशी तुरची या गावी स्वामी रमानंद भारती यांनी सुचविल्यानुसार संस्थेचे 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' हे नामकरण करण्यात आले. ३१ डिसेंबर १९५४ रोजी संस्थेचे रजिस्ट्रेशन झाले. दि. ६ जून १९५५ या दिवशी संस्थेच्या कार्याचा शुभारंभ झाला.

''साथी हाथ बढाना एक अकेला थक जाएगा। मिलकर बोझ उठाना, साथी हाथ बढाना।।

हम मेहनत वालों ने जब भी मिलकर कदम बढाया, सागर ने रस्ता छोड पर्वत ने शीश झुकाया।

फौलादी है सीने अपने फौलादी है बाहें। हम चाहे तो पैदा करदे चट्टानों मे राहे, साथी हाथ...''

याचप्रमाणे बापूजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या दिवशी कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे आणि उंडाळे या पाच ठिकाणी माध्यमिक विद्यालये सुरु केली. कराड येथे स्त्रियांचे अध्यापिका विद्यालय सुरु केले. तसेच कोल्हापूर व चाफळ येथे एक विद्यार्थी वसतिगृह सुरु केले. आतापर्यंत संस्थेचे कार्य फारच स्थिरावले आणि विस्तारले आहे. संस्थेचा कार्यविस्तार संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या काही भागात व शिवाजी विद्यापीठ यांच्या कार्यक्षेत्रात विस्तरला आहे. पुणे, मुंबई, मराठवाडा या विद्यापीठातही कार्यविस्तार वाढला आहे. संस्थच्या या संस्कृती केंद्रात एक लाखावर विद्यार्थी-विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

कोणतीही संस्था मग ती सामाजिक असो, राजकीय असो अथवा शैक्षणिक असो तिची काही ध्येय धोरण मानवतावादी, विचारातून आखली आहेत. 'ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ब्रीद वाक्यात संस्थेचे ध्येयधोरण बापूजींनी सुत्ररुपाने ग्रंथित केले आहे.

शिक्षणाचा हेतूच बापूजींनी या महामंत्रातून सांगितला. जेणेकरुन शिक्षणाने निर्माण झालेल्या व्यथा कमी होतील. विद्यार्थी समाजप्रिय राष्ट्र उपासक, त्यागी आणि उच्च प्रज्ञेचा राहिल असे उद्दीष्ट बापूजींनी दिले. ज्ञान म्हणजे काय? कोणत्या अर्थाने हा शब्द बापूजींनी वापरला आहे. बापूजींनी प्रार्थनेमधून ज्ञान या शब्दाचा अर्थ व्यक्त केला आहे.

सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग पिळवणुकीस आळा, मानवाचे अधिष्ठान, ईश्वरतत्व दर्शन नि विज्ञान यांचे ज्ञान.

'ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या घोषवाक्यातील विज्ञान हा दुसरा शब्द. विज्ञान म्हणजे सायन्स सुकृत दर्शनी अर्थ काढला जातो. 'कविज्ञान' हा शब्द सायन्स या शब्दाचे भाषांतरीत रुप नाही. तर विज्ञान हा शब्द वेदकालीन असून तेव्हापासून तो प्रचारात आहे. बापूजी म्हणत, जे ज्ञान मिळविले त्याचा उपयोग करणे, आणि ते ज्ञान आचरणात आणणे म्हणजे विज्ञान होय.

आपल्या प्रत्येक विचार आणि कृतीत 'मानव्यता' असली पाहिजे. ईश्वराचे दर्शन विचार-आचार यातून दिसले पाहिजे. मग अशी कृती सुसंस्कारमय ठरते. सुसंस्कारी मनुष्यच ईश्वराचा आविष्कार आहे असे बापूजी म्हणत.

लौकिक अर्थाने शिक्षण म्हणजे शासनाने ठरवून दिलेला पाठ्यक्रम पूर्ण करणे. खरे तर तोही अर्थ मागे पडला आहे. शिक्षण म्हणजे परीक्षा देणे. शिक्षण परीक्षार्थी करुन ठेवले आहे. परीक्षा का द्यायच्या? नोकरी मिळवण्यासाठी त्याचा उपयोग होतो म्हणून... शिक्षणामुळे नोकरी मिळेल हे त्याचे थेट उद्दिष्ट नाही. शिक्षण म्हणजे आत्मविश्वास, ज्याने शिक्षण घेतले आहे अशी व्यक्ती रोजगार निर्माण करण्यास सक्षम हवीच. ज्याचा आत्मविकास झाला आहे. तो कुठे उणा पडेल? 'तो उद्योगशील निर्माणकर्ता' असाच असणार म्हणून शिक्षणाचे उद्दिष्ट आहे, ''ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार''!

अज्ञानाशी लढायचे तर ज्ञानानेच लढता येईल.

महावीर मानवसंत मानव्याचे दिपस्तंभ
लीन होऊन त्याचे वंदुया चरण ।

धन्यवाद ....

मोहिते विकास अंकुश
बी. ए. भाग ३

# लक्षात नसलेला बाप

वडील, बाबा, पप्पा, डॅडी, पिता घेण्याला बोलण्याला खूप चांगल वाटतं पण आपण प्रत्येकण सहजपणे, नेहमी जाणूनबुजून शब्द उच्चारतो तो म्हणजे बाप होय. त्याच बापाविषयी थोडं काही – आई घराचं मांगल्य असते तर बाप घराचं आस्तित्व असतो पण घराच्या या आस्तित्वाला खरचं कधी आपण समजून घेतलं आहे का? वडिलांना महत्व असूनही त्यांच्याविषयी जास्त बाललं जात नाही लिहिलं जात नाही.

कोणताही व्याख्याता त्याच्याविषयी जास्त बोलत राहतो. संत महात्म्यांनी आर्श्यच महत्व अधिक सांगितल आहे. देवादिकांनी ही आईचच तोंड भरुन कौतुक केले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठचं फारस बोललं जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा. समाजात एक–दोन टक्के बाप असे असतीलही. पण चांगल्या पित्यांबद्दल काय, चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात तर बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन मात्र वडिलांनाच करावं लागतं. आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावरचं जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना, पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळतं.

रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते; पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आपण किती सहजपणे विसरुन जातो. आई रडते पण वडिलांना रडता येत नाही. बहिणींना आधार व्हायचं असतं. पत्नी अर्ध्यावरच सोडून गेली तर पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला असं आवश्य म्हणावं पण शहाजीराजांची त्यावेळची ओढाताण सुद्धा लक्ष्यात घ्यावी. देवकीचं, यशोदचं कौतुक आवश्य करावं. पण पुरातुतन डोक्यावरुन पोराला घेवून जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौसलेचा पुत्र आवश्य असेल पण, युद्धात तडपडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडीलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे पाहिले की त्याच प्रेम कळतं. त्यांची फाटक बनियन पाहिली की कळतं आमच्या नशिबाची भोक त्यांच्या बनियनला पडलेत. त्याची दाढी वाढलेला चेहरा, त्यांची काटकसर दाखवतो. मुलीला ड्रेस घेतील, मुलाला ड्रेस घेतील. पण स्वतःमात्र जुनी पॅन्ट घालायला काढतील. मुलगा सलूनमध्ये वीस–पंचवीस रुपये खर्च करतो. मुलगी ब्युटी पार्लर मध्ये तीस एक रुपये

खर्च करते. पण त्याच घरातील बाप दाढीचा साबण संपला म्हणून अंघोळीच्या साबणाने दाढी खरबडत असतो. अनेकदा तो नुसतं पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला की पटकन दवाखान्यात जात नाही. कारण, आजारी पडला म्हणून घाबरत नसून डॉक्टर एखादा महिना आराम करायला सांगतील याची त्याला भीती वाटत असते.

कारण पोरीचं लग्नं, पोराचं शिक्षण बाकी असतं घरात उत्पनाच दुसरं साधन नसतं. ऐपत नसते तरीही मुलाला इंजिनिअरिंगला, मेडिकलला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण सहन करुन त्या मुलाला पैसे पाठवले जातात. पण सर्वच नसली तरी, काही मुले अशी असतात. तारखेला पैसे येता मित्रांना परमीट रुममध्ये पार्ट्या देतात व ज्या बापाने पैसे पाठविले. त्याच बापाच्या नावाने एकमेकांना हाका मारतात. वडिलांची टिंगल करतात. आई घरंच असते तर बाप घराच आस्तित्व असतो. ज्या घरात बाप आहे त्या घराकडे वाईट नजरेनं कोणीही बघू शकत नाही. कारण, घरातला कर्ता जिवंत असतो. तो जरी काही करत नसला तरी तो त्या पदावर असतो. व घरच्यांचं कर्म बघतं असतो. कोणाचा मुलगा होणं टाळता येत नाही; पण बाप होणं टाळता येतं पण बाप कधीच बाप होण्याचं टाळत नाही.

आईच्या असण्याला किंवा आई होण्याला बापामुळेच अर्थ असतो. कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यानंतर आई जवळची वाटते कारण, ती जवळ होते व कवटाळते, पण गुपचुप जाऊन पेढ्यांचा पुडा आणणारा बाप आपण किती सहज विसरतो. पैलीट करणीचं खुप कौतुक होतं. पण हॉस्पिटलच्या आवारात अस्वस्थपणे वावरणाऱ्या त्या बापाची उभ्या उभ्या का होईना कोणी दखल घेत नाही. चटका बसला, ठेच लागली की ''आई गं'' हा शब्द आपल्या तोंडातून बाहेर पडतो. पण हायवेला रस्ता ओलांडताना एखादा ट्रक आडवा येतो तेव्हा ''बाप रे ! हाच शब्द आठवतो. छोट्या-छोट्या गोष्टींना आई चालते. पण मोठी वादळे पेलताना बापच आठवतो. काय पटतंना! कोणत्याही मंगलप्रसंगी सर्व मंडळी जातात. पण मयतीच्या वेळी बापालाचं जाव लागतं.

कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नाही. पण गरीब मुलीच्या घरी उभ्या-उभ्या का होईना चक्कर मारतो. तरुण मुलगा उशिरा घरी येतो. तेव्हा त्याची आई नाही तर बापचं जागा असतो. मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप खरचं किती ग्रेट असतो ना!

वडिलांचं महत्व कुणाला कळतं. लहानपणी वडिल गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. एकेका वस्तूसाठी तरसावं लगतं. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती, त्या घरातील 'मुलगी' सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या मुलीला बापाशी बोलताना बदललेला आवाज आपोआप कळतो. मग ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेल तेव्हा विवाहाच्या बोहल्यावर चढते. मुलगी बापाला जाणते, जपते, इतरांनी सुद्धा आपल्याला जाणवं हिच बापाची किमान अपेक्षा असते.

कु. थोरात शितल तुकाराम
बी. ए. भाग ३

# जीवन

जीवन फार सुंदर आहे.

जीवनात जर आपण एखादी गोष्ट हवी असेल तर ती आपल्याला सहजा-सहजी मिळत नाही. ती गोष्ट मिळविण्यासाठी खूप यातना सहन कराव्या लागतात. जीवनात माणसाला यश आणि अपयश दोन्हींचाही स्वीकार करावा लागतो. जर या जीवनात एकदा तरी अपयश स्वीकारावे लागते अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.

मला या जीवनात अनुभवात आलेल्या अनुभवाबद्दल मी हे जीवन जगत आहे. जीवन हे सुखदायी आहे आणि आनंददायी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात एकदा तरी सुखाची चाहूल येत राहते पण काहीची क्षणाची चाहूल असते. स्वःताला जीवनात काहीही मिळविण्यासाठी काहीतरी गमवावे लागते. जीवनात प्रवेश केल्यावर सर्व गोष्टींना सामोरे जावे लागते. प्रत्येकाच्या जीवनात दुःख येत राहतात. ते सहन करायला सामोरे जावे लागते. तरीही त्यातल्या त्यात काहीना जीवनात कायम दुःखच सहन करावे लागते असे हे जीवन आहे. जीवनात सुख ही तेवढेच मिळते आणि दुःखही तेवढेच मिळते आणि जो त्यातून पोहून निघालेला असतो तोच या जीवनाची गंमत सांगू शकेल.

जीवन हे सुंदर आहे, पण जो त्यातून पोहत निघतो त्यालाच ते समजते.

'जीवन गाणे गातच राहवे, झाले गेले विसरुन जावे, पुढे पुढे चालावे.'

जीवनातून आपण बाहेर पडतो तेव्हाच हे समजते जीवन म्हणजे काय आहे, जीवन फार फार छान आहे.

**अक्षय यादव**
बी. ए. भाग ३

## शब्द...

बोलताना जरा सांभाळून...
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते.
फरक फक्त एवढाच की,
तलवारीने मान तर
शब्दांनी मन कापले जाते
जरी तलवारीच्या जखमेतून रक्त
आणि शब्दांच्या जखमेतून अश्रू...
येत असले तरी,
दोघांपासून होणारी वेदना मात्र सारखी असते,
म्हणून म्हणतो शब्द जरा सांभाळून...
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते,
शब्दच माणसाला जोडतात आणि
शब्दच माणसाला तोडतात
हे शब्दच आहेत. ते कधी रामायण
तर कधी महाभारत रचतात
तुझ्या एका शब्दावर माझे सर्वस्व अवलंबून आहे
तुझ्या एका शब्दावर माझे माझे हसणे
तर, तुझ्या एका शब्दावर
माझे रडणे अवलंबून असते.
म्हणून म्हणतो शब्द जरा सांभाळून
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते.
शब्दाला जरा धार असते.

**विकास मोहिते**
बी.ए. भाग ३

## प्रेमाचं क्रिकेट

प्रेमाच्या क्रिकेटमध्ये
entry तिची झाली, केली मी
Batting अन् Bowling तिने केली...
हृदयाच्या Pitch वर तिचा यायचा,
समजत न्हवता Bouncer Ball
अन् तोल माझा जायचा...
Bowling चांगली सुरु होती
Batting पण बिघडली नाही,
over तिची पूर्ण झाली
Runs मात्र केले नाही.
Match पूर्ण हरलो तरी,
Bowling ला उत्तर दिले नाही...
चांगला Player असून सुद्धा
तिच्या विरुद्ध खेळलो नाही...
जिंकण्याच्या आनंदात
Match ती विसरुन गेली,
हृदयाची Pitch मात्र,
'सुनी-सुनी' सोडून गेली....

**अक्षय रविंद्र खैरमोडे**
बी.ए. भाग ३

# ममता

ममता म्हणजे काय?
आईचे प्रेम...
मधासारखे मधाळ...
दुधाच्या साईसारखे दाट...
पर्वताहूनी उंच...
सागराहूनी खोल...
वाऱ्यासारखे शीतल
बाळाच्या लीलेत स्वतःला
हरवून बसणारे आईचे प्रेम...
अनमोल दागिना...
ज्याच्याजवळ आहे तो भाग्यवान
मुलाच्या सुखाने हुरळणारे
मुलाच्या दुःखाने आक्रंदणारे
मुलाच्या आजारात रात्रंदिन जागणारे
मुलाच्या यशाने कृतकृत्य वाटणारे
आईचे प्रेम...
साताजन्माची पुण्याई लागते
असं प्रेम मिळवायला...
जगात कुठेही जा...
फरक नाही आईच्या प्रेमात
मला एक प्रश्न विचारायचा आहे परमेश्वराला...
आईचे प्रेम असे असताना...
बायकोच्या इशाऱ्यावर नाचणारी
दारु पिऊन गटारात लोळणारी
आपलं कर्तव्ये विसरणारी
जन्मदात्यांना दुःखाच्या खाईत लोटणारी
कृतघ्न अपत्ये तिच्या पोटी का घातली
की जन्मभर दुःख भोगण्यासाठीच
मातेची निर्मिती आहे ?
परमेश्वरा उत्तर दे अथवा देऊ नको
पण, मला एक सांगायचंय
तुलाही आईनेच जन्म दिला आहे ना
आई आहे तर सर्व आहे
तिच्याविना जग (आणि जीवन)
मातीमोल आहे.

**कु. मयुरी अंबवडे**
बी.कॉम. भाग २

# माणसे जोडा...

आयुष्यभर साथ देणारी माणसे जोडा,
नाहीतर तासभर साथ देणारी माणसं,
बसमध्ये पण भेटतात.
कधीही आपल्या दुःखाचा आणि
सुखाचा बाजार मांडू नका
कारण; इथे प्रत्येक जण मतलबी झालाय
अगरबत्ती देवासाठी हवी असते म्हणून
विकत आणतात; पण
सुगंध मात्र आपल्या आवडीचा पाहतात.

**कु. सुप्रिया संजय भंडारी**
बी.ए. भाग १

# प्रेम कुणावर करावे...

प्रेम कुणावर करावे?
जो आपल्याला आवडतो त्याच्यावर,
की, ज्याला आपण आवडतो त्यांच्यांवर?
प्रेम कुणावर करावे?
मन वेधून घेणाऱ्या गुलाबावर?
की, त्याला जपणाऱ्या काट्यावर?
प्रेम कुणावर करावे?
जन्म घेतलेल्या मायभूमीवर,
की हिच्यासाठी प्राण
अर्पण करण्याऱ्या जवानांवर
प्रेम कुणावर करावे?
सुंदर नाजूक वेलीवरं,
की, तिला आधार देणाऱ्या वृक्षावर?
प्रेम कुणावर करावे?
रंगीबेरंगी दिसणाऱ्या फुलपाखरावर,
की, तिला बागडण्याची
चेतना देण्याऱ्या वाऱ्यावर?
तुम्हीच सांगा...
प्रेम कुणावर करावे?
परवा भेटलेल्या मुलींवर
की आयुष्यभर आपल्यावरुन जीव
ओवाळून टाकणाऱ्या,
''आई- वडिलांवर''

**अनिरुध्द बबन शिंदे**
बी.ए. भाग ३

# असचं...

मनात ओढ लईच गोड,
जायाला लय ती नटली
सगळ्या College मधी बातमी उठली
अक्षयला कोणतरी पटली...
नजरा-नजर झाली यांची
मनाला-मन हो भिडलं
एकमेकांच चेहरं त्यांच्या
मनाच्या मंदिरात दडंलं.
भेटाया जाता तिला या
अमोलनं गाडीची चावी घेतली
सगळ्या College मधी बातमी उठली
अक्षयला कोणतरी पटली...
दुसरं तिसरं कोणचं नाही
Smily बसली मनात
सांज कळंना दिस कळंना
राती येती स्वप्नात
बघून बघून तिला माझी
हाऊस कधीच नाही फिटली...
सगळ्या College मधी बातमी उठली
अक्षयला कोणतरी पटली...
लिहाया गाणं तुला रं अक्षय मला सांग
बुद्धी सुचती कुठली
सगळ्या College मधी बातमी उठली...
Akshay ला कोणीतरी पटली...

**शुभम मधुकर चव्हाण**
बी.ए. भाग ३

# आवडलं मला...

मी कॉलेजला आल्यावर तू मला पाहणं
तुज्या मनात माझ्याविषयी विचार येणं
मग पुन्हा माझ्याकडं पाहणं... आवडलं मला...
मग पुन्हा भिरभिरती नजर करुन मला शोधणं
तू शोधत असताना माझी
नजर तुझ्या नजरेला मिळणं...
आणि त्याच क्षणी तुझी चोरटी नजर
दुसरीकडे फिरवणं... आवडलं मला...
मग त्या पहिल्या भेटीत माझ्याशी
संवाद साधणं...
आणि मग तुझा नंबर मी सेव्ह करणं...
आणि मग तुझा त्या गोष्टीला पूर्ण
पाठिंबा देणं... आवडलं मला...
मग हळूच Miss call देऊन,
चूकून call लागला सांगणं आवडलं मला...
तुझं ते गालात हसणं, अचानक घाबरणं,
अचानक शांत होणं... आवडलं मला...
मला माहित नाही यार,
तूं कधी कशी आणि कां?
माझ्या Life मध्ये आलीस...
मला वाटलही नव्हतं की
कोणी माझ्या Life मध्ये
अशा पद्धतीने येईल...
But तू आलीस आवडलं मला...
मला हेही नाही माहित की,
तूं मला Miss करतेस
का नाही. But या वेळेला
Miss you smily

**अमोल युवराज कोळेकर**
बी. कॉम. भाग ३

# मैत्रीण

एक तरी मैत्रीण अशी हवी
जरी न बघता पुढे गेलो तरी
मागून आवाज देणारी
आपल्यासाठी हसणारी
वेळ आलीच तर अश्रूही पुसणारी
स्वतःच्या घासातला घास
आठवणीने काढून ठेवणारी
वेळ प्रसंगी आपल्या वेड्या मित्राची
समजूत काढणारी
वाकड पाऊल पडताना मात्र
मुस्काटात मारणारी
यशाच्या शिखरावर
आपली पाठ थोपटणारी
सगळ्यांच्या गलक्यात
आपणास सैरभैर शोधणारी
आपल्या आठवणीनं
आपन नसताना व्याकूळ होणारी
खरंच! अशी एक तरी जीवा भावाची
मैत्रीण हवी जी आपणास
मित्र म्हणवणारी...

**कु. गुरव तेजस्वी तुकाराम**
बी.ए. भाग १

# जीवन...

जन्माला आला आहेस
थोड जगून बघ
जीवनात दुःख खूप आहे
थोडं सोसून बघ.
चिमूटभर दुःखाने कोसळू नकोस
दुःखाचे पहाड चढून बघ
यशाचे चव चाखून बघ
अपयश येतं निरखून बघ
डाव मांडणं सोपं असतं
थोडं खेळून बघ
घरटं बांधण सोपं असंत
थोडी मेहनत करुन बघ
जगणं कठीण मरणं सोप असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ
जीणं मरणं एक कोडं असतं
जाता-जाता एवढं सोडवून बघ.

**चव्हाण सागर सदाशिव**
बी.कॉम. भाग १

# मैत्री...

आयुष्यात त्या व्यक्तीला
कधीच नका विसरु
जी व्यक्ती तुमच्यासाठी
सारे काही विसरायला तयार असते...
आयुष्यात त्या व्यक्तीला कधीचं...
नका दुरावू
जी व्यक्ती तुमच्यासाठी
सर्वांपासून दुरावायला तयार असते...

**कु. भारती मोहन वायदंडे**
बी.कॉम. भाग २

# तुझ्याविषयी लिहिताना...

तुझ्याविषयी लिहिताना
काय लिहिवावे ते सुचतच नाही.
मनात भरपूर काय असतं लिहिण्यासारखं, पण..
कागदावर काही उतरतच नाही.
आठवते जेव्हा तुझी ती गोड स्माईल
तेव्हा उघडते तुझ्या आठवणींची फाईल
असं वाटतं त्या आठवणीत हरवून जावं
तूं जवळ नसतानाही तुला एकदा जवळ घ्यावं...

**कु. कांबळे क्रांती विकास**
बी.ए. भाग १

## तुझ्यासोबत जगायचंय...

मला आयुष्यातील प्रत्येक क्षण
तुझ्यासोबत घालवायचंय
तुझ्यासोबत जगायचंय
अनं तुझ्यासोबतच मरायचंय
भविष्यातील प्रत्येक क्षण
तुझ्यासोबत बघायचायं...
मला तुझ्यासोबतच हसायचंय...
आणि तुझ्यासोबतच रडायचंय...
तुझ्या स्माइलकडे खोलवर बघायचंय...
मला भविष्यातील प्रत्येक क्षण
तुझ्यासोबत घालवायचय...
मी हसावं आणि तू समजवावं...
मी चिडावे आणि तू लाडला यावं...
मी मिस करावं... आणि त्या क्षणी
तुही मला मिस कराव...
मला तुझ्यावर हक्काने रागवायचंय
आयुष्यातील प्रत्येक क्षण
तुझ्यासोबत घालवायचंय...
मला सकाळी सकाळी
तुझ्यासोबत चहा प्यायचाय...
दिवसभर तुझी स्माईल बघायची आहे...
तुला सतत मिस करायचंय...
भविष्यातील सुखःच्या क्षणात
तुला सहभागी करायचयं...
तुझ्या दुःखाचे क्षण मला व्हायचयं...
But As U Wish तुला काय करायचंय...

**सोमनाथ सोनाजीराव सुर्यवंशी**
बी.ए. भाग ३

## ध्येय...

कोणाच्या तरी बोलण्याने
कुचंबून जाणारं नसावं.
नसला आकार आभाळा एवढा तरी
त्याला स्पर्श करण्याचं ध्येय असावं.
नदीसारखं स्वच्छ असलं तरी,
वाहवत जाणारं नसावं
चिरुन प्रवाहाच्या लाटा
किनारा गाठण्याचं ध्येय असावं.
शिडासारखं असलं तरी
ढासळून जाणारं नसावं.
समन्वय साधत, सगळ्यापुढं
निघू पाहणारं ध्येय असावं
पानासारखं असलं तरी
लगेच गळून जाणारं नसावं
पाहणारं ध्येय असावं.
मुळ्यांसारखी पकड धरुन
आयुष्याच्या झाडाला तोलणारं असावं
सकटं आली तरी लांब पळून जाणारं नसावं
त्याच संकटांना पायाशी
खेळवणारं ध्येय असावं.
वाटेसारखं असलं तरी
थकून जाणारं नसावं
चुकलंचं जरी ह्या वाटेत तरी
शेवटपर्यंत झुंज देणारं ध्येय असावं.

**कु. पाटोळे प्रमिला पोपट**
बी.ए. भाग ३

## हा न्याय कसला!

रोजचीच बडबड, रोजचीच रडारड,
रोजच गातात अंधारातील गाणी.
किती घाबरावं, किती रडावं
रोजचीच हि कहाणी.
रोजच छळतात, रोजच मारतात,
घाणेरड्या त्यांच्या नजरा.
किती लढावं, किती पेटावं,
जळजळ त्यांची जळेना.
मान-सन्मान अशा वेळेला,
जातो कुठे सांगा.
'स्त्री शक्तीचा आदर'
हा नारा पोस्टरवरच चांगला.
लढलो तर, मग पलटवाराची
घ्यायची का आम्ही धास्ती.
पराक्रम नी मर्दानी यांची
उठे आमच्या जीवावरती.
रोजची न्यूज, रोजची काहाणी.
आज पुन्हा एक बळी,
जबरदस्ती न् बलात्कार
हा पुन्हा आज भाळी.
तंत्र पुढारुन करायचं काय?
विचारच पुढारेना.
गुन्हा करुन दोषी तो,
निर्दोष सुटलेला...
घाबरुन आम्हा सगळ्यांना,
मग घरात कोंडले जाते.
पुढचे आमचे आयुष्य
मातीमोल होते.
लग्न करुन मग,
पाठवणी आमची होते.
रोजच त्रास आणि आत्याचार
आयुष्याला कात्री लागते.
पळून तरी जाणार कोठे?
स्वातंत्र्यचं नाही आम्हा,
दोषी तर निर्दोष सुटतो.
हा न्याय देवा कसला.

**कु. पाटोळे प्रमिला पोपट**
बी.ए. भाग ३

## सोबत

तू सोबत असताना,
आयुष्यात किती छान वाटतं...
उनाड मोकळं,
एक रान वाटतं...
सदैव मनात जपलेलं,
पिंपळपान वाटतं...
कधी बेधुंद,
कधी बेभान वाटतं...
खरचं, तूं सोबत असताना.
आयुष्य किती छान वाटतं...

**सुहास वसंत माने**
बी. कॉम. भाग ३

## आई ...

आई तुझं हे अमोल बाळ
कसं तुला गं विसरु शकतं...
माझ्या कातड्याचे बनवूण जोडे,
तुझ्या पायात घालू शकतं...
तुझ्यासाठीच आई हे हसतं,
तुझ्यासाठीच कधीही रडतं... धृ।।
आई तुझ नं माझं नातं
हे कधीही विसरत नसतं...
तुझ्याशिवाय आई
त्या जगात श्रेष्ठ कोणी नसतं...
दुनिया म्हणते ऐसा श्रेष्ठ,
असं कधीचं कुठं नसतं...
ज्याने आईला जीव लावला
त्याला कधीच काही कमी नसतं...
आई तुझं हे अमोल बाळ
कसं गं तुला विसरु शकतं...
माझ्या कातड्याचे बनवून जोडे,
तुझ्या पायात घालू शकतं...

कु. करांडे राजश्री धनराज
बी. ए. भाग ३

## जीवन सार

जन्माला आला आहेस
थोडं जगून बघ
जीवनात दुःख खूप आहे
थोडं सोसून बघ
चिमूटभर दुःखाने कोसळू नकोस
दुःखाचे पहाड चढून बघ
यशाची चव चाखून बघ
अपयश येतं निरखून बघ
डाव मांडणं सोपं असतं
थोडं खेळून बघ
घरटं बांधणं सोपं असतं
थोडं मेहनत करुन बघ
जगणं कठीण मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ
जीणं मरणं एक कोडं असतं
जाता-जाता एवढं सोडवून बघ.

**सौ. मयुरी अंबवडे**
बी.कॉम. भाग २

# हिंदी विभाग

धरती को बौनों की नहीं,
ऊँचे कद के इंसानों की जरूरत है।
इतने ऊँचे कि आसमान छू लें,
नये नक्षत्रों में प्रतिभा की बीज बो लें,
किन्तु इतने ऊँचे भी नहीं,
कि पाँव तले दुब ही न जमें,
कोई काँटा न चुभे,
कोई कली न खिले।

**– अटल बिहारी वाजपेयी**

विभागीय सहसंपादक
**प्रा. एस्. पी. खोत**

# अनुक्रमणिका

## (गद्य विभाग)


१) सिंगापुर में तीन दिन — कु. कोमल पाटोळे


## (पद्य विभाग)


१) माँ मुझे भी पंख लगा दो। — महेंद्र जाधव

२) जिंदगी — कु. तेजस्वी गुरव

३) क्या बात है। — कु. कोमल पाटोळे

४) शोक भरी सावित्री — कु. प्रमिला पाटोळे

५) हमारा महाविद्यालय — कु. कोमल पाटोळे

६) बेटी — कु. कोमल पाटोळे

७) सपना — नवनाथ घार्गे

८) बातचीत — कु. क्रांती कांबळे

९) मंजिल — अफरिद पटेल

१०) काबिलियत — महेंद्र जाधव

# सिंगापुर में तीन दिन !..

सिंगापुर इसका सही मूल नाम – सिंगापुर। ऐसे रहते हुए इस नाम से वह भारत से संबंध है यह सिद्ध करता है, क्योकी 'सिंगापुर' यह संस्कृत शब्द है। पिछले जमाने में पूर्व क द्विप साथ भारत का संबंध था। यह द्विप समूह आज मलेसिया और इंडोनिसिया में है। सभी तरफ संस्कृत साहित्य में स्वर्णभूमी कहा गया था। यह राज्य भारतियोंने स्थापित किया था। भूजंग नदी किनारे सटा हुआ इटों के घर बुद्ध की मुर्ती, सब कुछ दर्शाता है, कि वह प्रदेश भारत से संबंधित है। सिंगापुर राज्य का एक भाग है शिलेंद्र साम्राज्य के अवनती के बाद मलय में मुस्लिम साम्राज्य का उदय हुआ। पहले कटावण्णी का व्यापार अरबो के हाथ में था। ततपश्चात वह पार्तुर्गीज के हाथ में गया। बाद में वहाँ के लोगों को भगा के इंग्लिश लोगों ने मलाई में अपने पैर रखे।

पहले तो वह लोग व्यापार के लिये आए थे, धीरे धीरे वह लोग मलाई पर राज करने लगे। १७९५ में सिंगापुर पुरी तरह ब्रिटीशों के हाथ में आ गया। सिंगापुर में वस्तू संग्रहालय में द्रविड शैली मंदिर की प्रतिकृती देखने को मिलेगी। भारत के बाहर एक कन्नडी आदमी चार दिन रुका तो उसकी मातृभाषा भूल जाना एक बहुत बडी भूल होती है। परंतु कोई ऐसा नही करता क्योंकी प्रत्येक आदमी को अपने

सिंगापुर में ठहरे हुए हॉटेल न्यू पार्क चंगी हवाई जहाज स्थानक से कुछ दुरी पर था। और जब हम ठहरे हॉटेल के मार्गदर्शक परवेज मेहता ने हँसते हुए हमारा स्वागत किया। सिंगापुर मे वही हमारा गाईड था। न्यु पार्क हॉटेल से एक तरफ मार्केट ही नजर आ रहे थे। शंगरुन मार्केट में जो चाहे वह वस्तु मिलती है। भारत के हर तरह का खाना उडपी हॉटेल, मसाला डोसा, उप्पीट, डोसा, इडली सब कुछ केले के पत्ते पर परोसते है। तब हमे ऐसा लग रहा था कि भारत अब बिलकुल भी दूर नही है। परंतु पॉकेट में से डॉलर कैसे खत्म होता है पता ही नही चलता था। वहाँ का एक पेन भी ७५ रु. का था। सिंगापुर में वस्तु बहुत महँगी है। फिर भी सिंगापुर में जाकर एक वॉचतक नही खरिदा था। सिंगापुर आकर कोई फायदा नही।

सिंगापुर में शिंगरुन रस्ते के बाजू में एक देवी का मंदिर था। उसमें सब देवताओं की मुर्तियॉ थी। भारत की भक्ति वहॉ पर देखा जा सकती है। फुटपाथ से जब हम जा रहे थे, तो एक आदमी ने आकार येनम्मा, यन्नावेणू? ऐसा पुछा। पिछे देखा तो एक आदमी उसके भाषा में उसके दुकान को बुला रहा था। उस जगह में बहुत सारे लोग तामिळ, हरियाना और पंजाब से थे। सिंगापुर टीन और टब्णर

के लिये प्रसिद्ध था। ऐसे ही वहाँ ब्रिटीशो ने इसे बंदर के लिए भी प्रसिद्ध किया था। यहाँ की मार्केट बहुत ही आकर्षक है।

देखा तो ऐसा लगा कि स्वर्ग जैसा था। यहाँ पर रोज १६00 जहाज आते और सहस्तों जहाज जाते भी है। यहाँ के मार्केट में सोने की वस्तुएँ और कुछ आकर्षक वस्तुएँ जगमगाते है। यहाँ पे १२ मंजिली इमारते है। सिंगापुर में गांव का एक भाग फेमस है। उसका नाम है मटॉसा नाम का छोटा द्विप। यहॉ के बहुत ही आकर्षक इतिहास प्रसिद्ध वस्तु संग्रालय है। यहॉ पानी के फौव्वारे बहुत ही आकर्षक है।

**कु. कोमल पाटोळे**
बी.ए. भाग ३

## माँ मुझे भी पंख लगा दो।

मुझको जीवन दर्शन करा दो
इस गगन की सैर करा दो।
मैं बेकरार हूँ उडने को
माँ आओ, मुझे भी पंख लगा दो।
तेरे कोख में लेटी-लेटी
सपनों में ही उडती रही हूँ।
जब भी चाहा उडना तुमने,
सोच में भी उडती रही हूँ।
उडान तुम्हारी देखकर
मन मेरा, भी व्याकूल हुआ।
माँ, लगा दो पंख मुझे,
फिर यह गगन अपना हुआ।
मै जा बैठुँगी बादल पर
बिजली से मैं खेलूँगी।
और छिपाकर बाहों में
चाँद ले आउँगी।
माँ, मेरे सपने बहुत बडे है
जीने का एक मोका ही दे दो।
नही बनूँगी बोझ मैं तुम पर
खोल दो मुट्ठी, उड जाने को।
मेरा जीवन निखरा दो
इस गगन की सैर, करा दो।
मैं बेकरार हूँ उडने को
माँ आओ, मुझे भी पंख लगा दो।

**महेंद्र जाधव**
बी.ए. भाग ३

## जिंदगी

जिंदगी यूँ हुई बसर तन्हा,
काफिला साथ और सफर तन्हा,
अपने साये से चौंक जाते है,
उम्र गुजरी है इस कदर तन्हा,
रात भर बोलते है सन्नाटे,
रात काटे कोई किधर तन्हा,
दिन गुजरना नहीं है लोगो में,
रात होती नहीं बसर तन्हा,
हमने दरवाजे तक तो देखा था,
फिर न जाने गए किधर तन्हा,

**कु. गुरव तेजस्वी**
बी.ए. भाग १

## क्या बात है।

खुद्द ही अपना, खुदा बनो
वक्त तुम्हारे साथ है।
मंजिल अपनी खुद चुनो
डरने की क्या बात है।
तेरी तकदीर तेरी इफाजत करेगी
रात हो या दिन सदा ऑखे भरेगी
भरोसे की क्या बात है।
राह भी तुझे अपनाकर खुद देगी पुकार।
रखो वफाई खुद के पास बेवफा न बनना
देख बुरी है बुराई सदा।
सच्चाई अपनाना
कामयाबी की क्या बात है।

**कु. कोमल पाटोळे**
बी.ए. भाग ३

## शोक भरी सावित्री

सावित्री ये नदी हमारी
है जीवनदायिनी,
सबको जीने के लिए
देती ढेर सारा पानी ।।१।।

लोग सारे करते
पूजा उसकी रोज,
एक दिन नदी अचानक
क्यो, गई हम पर कोप ।।२।।

टुटा पुल गिरे सपने
डुब गए पानी में
सबको अपने, साथ लेकर
जा मिली समंदर में ।।३।।

मृत्यूघाट बनी महानगरी
बारिश भरी वो धनी।
अमावस की रात काली
सच में निकली काली ।।४।।

किसे पता था
उस रात होगी
इतनी बडी अनहोनी
सावित्री ये नदी बनी
शोक भरी कहानी ।।५।।

**कु. प्रमिला पाटोळे**
बी.ए. भाग ३

## हमारा महाविद्यालय

आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
कडेपूर महाविद्यालय,
है सांगली जिले की शान।
शिक्षा के क्षेत्र में, है बहुत महान।।
फूल पौधे रंगमंच
क्या बताएँ शान,
देखनेवाले होते है हैरान।।
आओ देखें नया सुंदर रम्य द्दश्य
पढने-लिखने में छात्र है रममान
जिन्हें देखकर मन भर जाती है अभिमान।।
यह प्रात: ; है कि सपने का दृश्य
प्रधानाचार्य, अध्यापक और सेवक
है बडे बुद्धिमान।।
छात्र नहीं थकते, गाते उनका गुणगान
स्वर्ग से भी अधिक है उसकी शान।
ऐसा हमारा महाविद्यालय है सबसे महान।।

**कु. कोमल पाटोळे**
बी.ए. भाग ३

## बेटी

बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी घर की लक्ष्मी होती है।
बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी एक तेजस्वी ज्योती की तरह होती है।
बेटी कभी बोझ नहीं होती ।।१।।
बेटी दो घरों को रोशन करती है।
बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी मायका और ससुराल दोनों रिश्ते निभाती है।
बेटी कभी बोझ नहीं होती ।।२।।
बेटी ही है जो माँ का कर्ज चूका सकती है।
बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी हर सुख-दुःख में साथ देती है।
बेटी सबको खुश रखना चाहती है।
बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी हर दुःख सहकर भी चूप रह सकती है।
बेटी कभी बोझ नहीं होती
बेटी दुर्गा का रूप होती है।...

**कु. प्रमिला पाटोळे**
बी.ए. भाग ३

## सपना

जिंदगी कुछ नहीं
एक सितम एक मुसीबत के सिवा
वक्त में भी कोई सहारा नहीं देता
बस यही हमारे दिमाग में नहीं आता।
बदल जाती है जब किस्मत
तब कोई न साथ देता है।
जिन्हें हम अपना समझते हैं,
वहीं दुत्कार देतें हैं।
करते कोशिश हम,
पर रास्ता कहाँ मिलता है।
नसीब भी क्या है,
जो सोचा न था, वहीं होता है।
किस्मत की बात अलग है,
आखिर जिंदगी एक सपना है।
याद किया तो अपना है,
और भूल गया तो सपना है।

**नवनाथ घार्गे**
बी.ए. भाग २

# बातचित

पत्नी – जब आदमी मरता है तो उसे
उस पार जाकर क्या मिलता है?
पती – अप्सरा मिलती है अप्सरा !!!
पत्नी – और औरतों को...
पती – बन्दर...!
पत्नी – क्या किस्मत मिली है आपको
आपको तो यहाँ भी अप्सरा और
उस पार भी
और फुटी किस्मत हमारी
हमें तो उस पार भी बन्दर
और इस पार भी...

**कु. क्रांति कांबळे**
बी.ए. भाग १

# मंजिल

सामने हो मंजिल तो रास्ते ना मोडना
जो भी मन में हो वो सपना मत तोडना,
कदम–कदम पर मिलेगी मुश्किल आपको
बस सितारें छूने के लिए जमीन मत छोडना !

**आफ्रिद पटेल**
बी.ए. भाग २

# काबिलियत

काबिलियत इतनी बढाओ की...
आप को, हराने के लिए
लोगों को... कोशिशें नही
साजिशें करनी पडें...

**महेंद्र जाधव**
बी.ए. भाग ३

# ENGLISH SECTION

Praise or blame has but a momentary effect on the man whose love at beauty in the abstract makes him a severe critic on his own works.

**John Keats**

Section Editor
**Prof. Ambawade R. J.**

# INDEX

## (Prose Section)


| | |
|---|---|
| 1) Swami Vivekanand - A Philosopher Saint | Tejaswini Gurav |
| 2) Anita Desai - As a female Writer. | Saurabh Bhosale |
| 3) The Essence of Buddhism | Mayuri Gavale |


## (Poetry Section)


| | |
|---|---|
| 1) My College Days | Shubham Mane |
| 2) Word Play | Priyanka More |

# Swami Vivekanand - (1863-1902) A Philosopher Saint

Swami Vivekanand possessed a manifold personality. He was a monk, a teacher, a mystic and a philosopher, a patriot and a saint, all together. He was well know even in America because of his historical address at the parliment of Religions in Chicago in 1893. He had a vast knowledge of eastern eloquence and human sympathy. His efforts were directed to words the Salvation of India, removal of misery form the world and spread the knowledge of divinity.

Swami Vivekanand was born on Monday, January 12, 1863. His mother Bhuvaneshwari Devi and father Vishwanath Dutta had named him Narendranath Dutta at the age of Sixteen, he went to Kolkata to live with his brother. Though he had passed the HIgh school in the first division, he was reluctant to go to college for further studies. He felt an immense desire for the realization of God.

Sri. Rama Krishna taught Narendra the true essentials of Hinduism. It was sort of a reoriention programme for Narendra because the college education had made him forget some of the noble principles of Hinduism which he had learned in his childhood at his home under the loving care of his mother. Sri. Ramam Krishna taught him the meaning of Hinduism, which according to him was inne rexprience and respected other religion and beliefs Narendra further realized that religion was a vision which trancended all barriers of caste and creed it was beyond the realm of the time and space. He learnt that worship led the devotee to the realization of oneness with the Divine and the divinity of the soul is realized. One can the God consciousness though the divine discipline of different religion charistianity, Islam and Hindu.

Narendra was himself an idol to the younger devotees. His devotees were impressed by his intelect Narendra lived on a very high plane the realm of absolute.

It was during the year 1885 that Sri. Rama Krishna became ill. Later it was known that he was suffering form

from cancer. Sri Rama Krishna passed away leaving his spiritual legacy and became the sprititual ambassdar of Sri. Ramam Krishna and spread his message thorugh the world. He began to move form one place to another in search of peace and realization of God. He want longer the same old Narendra but swami Vivekanand now.

In the year 1895, Swami Vivekanand wrote his famous book Rajayoga. A book in yoga aphorism, it was a translation of patanjali's philosophy of yoga with Swami's own explanations. Swamiji had also writtern book like Bhakti yoga and Karma yoga one of his most famous lectures delivered was on 'The Philsophy of Vedanta' His meritorious audiences were none other than the student of the Philosophy department of Harvard University.

Swami Vivekanand always went out in sympathy for the poor. One day, he arranged a feast for the poor labourers and served them with tasty food. He said to them, 'Today I have entertained the lord Himself by feeding you.' Later the said to his disciples, " Look, how simple hearted these poor people are, will you be able to mitigate their suffering to some extent?" He said, The re monasticism lies in sacrificing every thing for the good of other.... Let us to go the village and serve the poor .... Alas, nobody in our country thikns for the poor... where is the man in our country who sympathises with them."

He again said, " He is present in all beings these are all the manifested forms of him there in no other God to seek for..."

Swami Vivekananda passed away at the age of thirty-nine the room in which he uesd to live at the monastery has not been distubred since his death the calender one the wall reads July 4.1902, the last day of his life.

Gurav Tejaswi Tukaram
B. A. Part I

# Anita Desai - As a female writer

Anita Desai confesses that while, she feels about India as an India, she thinks about it as 'an outsider.'

Desai probably derived this point of view from her German mother, whom she aptly describes as carrings European core in her which protested certain Indian things, which always maintained its independence and its separateness. Her oeuvre origin Ruth Prawer Jhabvala. Though some critics detect a western dis dasa for Indian Social customs in her Fiction, ultimately Desai's literary world is not sharply divided along Western and Eastern lines on the, ever Since her novel Baumgartner's Bombay (1987), East and West have been trebted as images of each other.

Desai's novels and short-stories eovke characters events and moods with recoarse to a rich use of visual imagery and details which has led to comparisons with the mode mist sensibiltyties of T. S. Eliot Willam Faulkner and Virgina Woolf are the origin of her stories as the writer explains itself in images; There are so many images that remain in the mind but they often vanish but there are certain images certain remembers they stay with you and eventually these come together you begin to see what the connection is between them. Thus the immobility and frustration of the central female character in Clear Light of Day (1930). Bimdas an apparently independent woman who is hostage of her past memories are conveyed by zooming in on several details of the bo use where she lives signifying deary and dullness. Bim's sister Tara who is visiting her in the crambling family mansion in delndaring the momentous days of partition observes that the dullnes and the boredom of her child hood and her youth were sorted here in the bloated brass ware amongst the dried grassess in the swollen vases behind the over frem's every thing every thing that she had so hared as a child and that was still preserved here as if this were the storeroom of some dulluninviting provincia jmuseum

museum the generational confrontation is clear light of Day is echoed in most of Desai's other works form the early Fire On the Mountain (1977), which considers the relationship between a reduse grand mother and her granddaughter to the later Novels Journey to Ithaaca (1995) Fasting and feasting (1999) in the former she spiritual pilgrimage to India. of yours and wealthy european couple Matteo and sophie is later version of that of their agening Guru the Mother while the left depicts the struggler of Umu going and Ag una to strike a balance between their parents, expectations and their own personal realization typical of Desai's other fiction is also the use of the house as aplace of confinement for woman like him Nanda Koul in her on. The Mountain lotte in baumgartner's bombay and Uma, her mother and Mrs. Pattan in Fasting Feasting rarely walk through the streets of their cities and towns in her article. A secred connivance Desai describes in similar theme the fate of indian woman who have had to confine themselves to the demotic scene, Few woman have had to confine them any experince of the world outside their homes and families.

As Desai herself admits her novels are not populated by heroic characters whether male or female at least in the traditional sense its protagonist are marked by certain passivity and have been criticized as being swept away by historical and social forces rather than being able to face and control then yet show a kind of heroism survival I think if you can come through the experience of life with the needs tabe celebrated in spite of the heroic huances of these survivals desai characters of teb meet tragic endings desai portrays a ficitional world where according to har own definition history is a kind of juggevaut which completely drives over character without compromising yourself that to me is a her oicact the needs to be protagonist wago baumgrtner is few who fied fronth Nari Germany to India only to find he cannot be truly accepted by Indian society either he is fivst interneed in a camp for Germans during the second world war and then remaing afirangi a stranger in a camp for Germans during the second world war a firangi a stranger in post independance India in the end his escape to India is pointless as he is killed by a German drifter whom be is trying set free from durg addiction the novels is a powerful literary embodiment of Desai's claim that east and west are parallel not contrasting world's I could have made

a contrast of the way Europe treated baumgraten and the way India treats him but I am ways discover that there is ntagreat contrast there are always parallels India too exluders him because he is a foreginer the way he was excluded in Europe.

Fasting Feasting might have as its epigraph the authors assertion that different lives are parallel lives as constant correspondences are dream between and Indian and an American middle-class family Umals traditional Indian parents desperately trying to arrange a good marriage for Uma with disastrous consequences suffer from the some lack of communication with their children as the pattons the American suburban family where Uma's brother is taying while on vacation from his American University whether Desai's charaters live on the banks of the gang of or amidst the empress of massachusetts they cannot find meaningful per Sonal relation ships other than with their own Solitude.

Bhosale Saurbh Jitendra
B. A. II

# The Essence of Buddhism

Whatever we are, whatever we have made of our lives is the result of our thoughts. Our world stands on the foundation of our thoughts. If a good thought guides your action, be sure that happiness will follow you like your shadow.

If you keep thinking of all the ways in which others cheated you, fought with you, degraded you or angered you, your heart will forever be full of harted Learn to let go and be Happy.

If you see a poor virtuous face man, try to ingore the poverty and look only at the virtue.See the smile on his fate. He delights in this world and the next. Such is the purity of the virtuose man.

The man who performs evil acts. Suffers in both worlds. He suffers the results of his act in this world and he suffers in dreading the vicissitudes of the next world, such is the fate off the eivil door.

Have you seen a cowhead counting the Cattle of ohter pepole 'You will find many such people in the world. The know all the scriputers and can recite them most elegantly but they have never practiced what they learnt. They are the couheard with cous belonging to others.

It is the earnest who seek the source of highest happiness. The thoughtless are too busy with their petty pleasures to have such a broad vision, with wisdom, the earnest meditate on the highest happiness and surely attain it.

Think twice before performing each action so too analyse your thought before aching every thought and every act determines the course of your life never forget this lesson. Ego is the greatest corrupts at all you may pray continuously. give many gifts and were ochre robes. But if you cannot get rid of ego. all this is futile .

A man who does not speak may not be wise.

A man who chatters incessantly may not be wise. Wisdom lies in knowing when to speak and when to be silent

Miss. Mayuri Ambavade

B. Com. II

# MY COLLEGE DAYS

Those were the best days of my life,
When fun and frolic was rife.
A refreshing realm of knowledge,
That was my college.

Funny friends and loving lectures,
Freaky fundas and flexible study hours.
Riddles and rumors, gossips and giggles-umptee
Added spice to the jusk I hogged at the college canteen.

I majoured in English Literature,
And the subject suited my sensitive nature.
I was initiated into the world of stories, poems and plays
Each lecture set my imagination ablaze.

My college was a literary paradise
Where I learnt to critically analyze,
Every text that came my way,
Be it poetry, prose or play.

Free from the fetters of school,
I willingly jumped into the knowledge pool
Where education was mixed with entertainment,
At College learning was never a punishment.

by Supriya Pratapam
Collected by Shubam Mane
(B. A. III (Spl. Engl)

# WORD PLAY

Once I was traveling from
Mumbai to Singapore a woman
sitting in the next seat continued
looking at me I understood that
this lady had never seen a Sardar
before. Midway in the flight when
the tea and snacks were served. I
struck a conversation with the lady,
Her name was Margarita and she belonged
to spain, During the conversation
She asked, "What are you?"
I replied, " I am Sikh"
said the young lady. I am sorry,
Hope you get well soon "To this I replied, "No dear I am not sick as
that of the body. I am Sikh as of religion"
The lady was very pleased and shook hands with me
and said, "It is a nice meeting you I am also sick of religion.

(Khuswant Singh Joke Book)

Priyanka More
B. A. I

# अहवाल विभाग

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## अहवाल २०१७–२०१८

### आंतरराष्ट्रीय योगदिन

दिनांक २१/०६/२०१७ रोजी सकाळी ९.०० वा. महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त योगासनांचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. के. जे. सपकाळ हे उपस्थित होते. त्यांनी मानवी जीवनात योगाचे महत्व सांगून प्रत्यक्ष योगासने करून घेतली. त्याच बरोबर त्या–त्या योगासनाचे शरिरावर होणारे परिणाम सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनी 'योगासने व मानवी आरोग्य' या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थींनी उपस्थित

### राष्ट्रीय सेवा योजना व उद्घाटन

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासी उद्घाटक म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. लालासाहेब यादव व मा. बबनराव उर्फ भाऊसाहेब यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी मा. लालासाहेब यादव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास राष्ट्रीय सेवा योजना व योगदान या विषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्याचबरोबर पर्यावरण संवधर्नसाठी वृक्ष लागवडीचे महत्व विषद केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ६० वृक्ष रोपन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. पवार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. आर. पी. महानवर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी–विद्यार्थींनी, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य दिन

दि. १५/०८/२०१७ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक – स्वयंसेविका उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन

दिनांक ०८/०९/२०१७ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अहिरे आय. बी. (अर्थशास्त्र विभाग प्रमुख) हे उपस्थित होते. त्यांनी भारतातील साक्षरतेचा आढावा घेऊन साक्षरतेशिवाय त्यांचा विकास होणार नाही असे सांगून १००% साक्षरता होण्यासाठी सार्वजनिक पातळीवर होणाऱ्या प्रयत्नाविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनीही साक्षरतेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महानवर आर. पी. तर आभार प्रा. बी. बी. पवार यांनी मानले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस्. पी. खोत यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयात प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना दिन

दिनांक २५/०९/२०१७ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' दिन संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील माजी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीमती एस्. वाय. पाटील उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास व उद्देश सांगून देशाच्या जडणघडणीमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या योगदानावर भाष्य केले. अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी. बी. पवार यांनी तर आभार प्रा. आर. पी. महानवर यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस्. पी. खोत यांनी केले.

# अहवाल विभाग

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## अहवाल २०१७-२०१८

### आंतरराष्ट्रीय योगदिन

दिनांक २१/०६/२०१७ रोजी सकाळी ९.०० वा. महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त योगासनांचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. के. जे. सपकाळ हे उपस्थित होते. त्यांनी मानवी जीवनात योगाचे महत्व सांगून प्रत्यक्ष योगासने करून घेतली. त्याच बरोबर त्या-त्या योगासनाचे शरिरावर होणारे परिणाम सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनी 'योगासने व मानवी आरोग्य' या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थींनी उपस्थित

### राष्ट्रीय सेवा योजना व उद्घाटन

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासी उद्घाटक म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. लालासाहेब यादव व मा. बबनराव उर्फ भाऊसाहेब यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी मा. लालासाहेब यादव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास राष्ट्रीय सेवा योजना व योगदान या विषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्याचबरोबर पर्यावरण संवधर्नसाठी वृक्ष लागवडीचे महत्व विषद केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ६० वृक्ष रोपन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. पवार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. आर. पी. महानवर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थीनी, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य दिन

दि. १५/०८/२०१७ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक – स्वयंसेविका उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन

दिनांक ०८/०९/२०१७ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अहिरे आय. बी. (अर्थशास्त्र विभाग प्रमुख) हे उपस्थित होते. त्यांनी भारतातील साक्षरतेचा आढावा घेऊन साक्षरतेशिवाय त्यांचा विकास होणार नाही असे सांगून १००% साक्षरता होण्यासाठी सार्वजनिक पातळीवर होणाऱ्या प्रयत्नाविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनीही साक्षरतेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महानवर आर. पी. तर आभार प्रा. बी. बी. पवार यांनी मानले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस्. पी. खोत यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयात प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना दिन

दिनांक २५/०९/२०१७ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' दिन संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील माजी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीमती एस्. वाय. पाटील उपस्थित होत्या. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास व उद्देश सांगून देशाच्या जडणघडणीमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या योगदानावर भाष्य केले. अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी. बी. पवार यांनी तर आभार प्रा. आर. पी. महानवर यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस्. पी. खोत यांनी केले.

## आपत्ती व्यवस्थापन जनजागृती उपक्रम अहवाल

**१. निबंध स्पर्धा :** दि. २४/०९/२०१७ रेजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

**२. चित्रकला स्पर्धा :** दि. २५/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

**३.भित्तीपत्रिका :** दि. २६/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने आपत्ती व्यवस्थापन या विषयावर माहिती देणाऱ्या भित्तीपत्रिकेचे प्रकाशन मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

**४. आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम :** दि. २७/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. ''**आपत्ती व्यवसस्थापन जनजागृती**'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून भूगोल विभाग प्रमुख प्रा. के. एम. माने यांनी मार्दर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनीही आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

**५. वक्तृत्व स्पर्धा :** दि. २८/०९/२०१७ रोजी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत '' **आपत्ती व्यवस्थापन जनजागृती**'' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

**६. रक्तदान शिबिर :** दिनांक २८/०९/२०१७ रोजी कडेपूर महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, मिरज यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी बहुसंख्येने रक्तदान केले. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमअधिकारी प्रा. बी. बी. पवार, प्रा. आर. पी. महानवर यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. एच्. पी. शिर्के, प्रा. के एम. माने, प्रा. श्रीमती एस्. वाय. पाटील इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिंनीनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन. एस्. एस्. कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. बी. पवार यांनी केले तर आभार प्रा. सतिश पाटील यांनी मानले.

# विशेष श्रमसंस्कार शिबिर अहवाल २०१७-२०१८

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे अपशिंगे येथे दिनांक ०४/०१/२०१८ ते दिनांक १०/०१/२०१८ या कालावधीत संपन्न झाला.

या शिबिराचे उद्घाटन मौजे अपशिंगे गावच्या सरपंच सौ. शुभांगी आनंदा सुर्यवंशी यांच्या शुभहस्ते झाले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे लाभले तसेच या कार्यक्रमासाठी उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन व सदस्य, ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष श्रमसंस्कार शिबिरात एकूण १०० स्वयंसेवक व स्वयंसेविका सहभागी झाले होते. हे सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका सात दिवस मौजे अपशिंगे येथे मुक्कामी होते. शिबिर काळात विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता केली. महत्वाचे म्हणजे अपशिंगे गावचे ग्रामदैवत असलेल्या महादेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम विद्यार्थ्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने केले तसेच महादेव मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्याची दुरुस्ती या काळात केली गेली. महादेव मंदिर परिसरात वृक्षारोपणासाठी २०० खड्डे खोदण्यात आले या सर्व कामाचे शासकीय मूल्य दीड लाखापर्यंत होऊ शकते.

शिबिरकाळात श्रमदानाबरोबरच गावातून मशालफेरी, प्रबोधन फेरी, अंधश्रध्दा निर्मूलन फेरी काढण्यात आल्या. त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासाठी व ग्रामस्थांच्या प्रबोधनासाठी सामाजिक माहितीपट दाखवण्यात आला. तसेच बँकींग सुविधा, ग्राहक जनजागरण, वारकरी सांप्रदायाचे कार्य, व्यक्तीमत्व विकास, शाश्वत ग्रामीण विकास, वाचन संस्कृती काळाची गरज, वस्तु व सेवा कर, महिला सबलीकरण अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यांनांचे आयोजन करण्यात आले होते.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप मा. विजयकुमार धायगुडे (नायब तहसीलदार, कडेगांव) यांच्या प्रमुख उपस्थित व मा. प्राचार्य पुंडलिक चव्हाण (सहसचिव प्रशासन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर) यांच्या अध्यक्षकतेखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे, सरपंच सौ. शुभांगी आनंदा सुर्यवंशी यांच्या उपस्थित संपन्न झाला. समारोप समारंभासाठी ग्रामपंचायत सदस्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका बहुसंख्येने उपस्थित होते.

हे विशेष श्रमसंस्कार शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. पवार, प्रा. आर. पी. महानवर, प्रा. श्रीमती संगिता पाटील, प्रा. डॉ. एच. पी. शिर्के, श्री. आर. डी. पवार, श्री. के. जे. सपकाळ, यांनी विशेष परिश्रम घेतले त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व प्राथ्यापक बंधूभगिनी व प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. बी. बी. पवार**
(कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना)

## पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळा अहवाल

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज कडेपूर, महाविद्यालयात जिमखाना विभागामार्फत शिवाजी विद्यापीठ व अग्रणी महाविद्यालय समूह अंतर्गत पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण या विषयावर गुरुवार दि. २२/०२/२०१८ रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे, प्रमुख वक्ते प्रा. किरण पाटील, प्रा. डॉ. दशरथ देशिंगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. प्रा. एस्. डी. झिटे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रथम सत्रामध्ये प्रा. डॉ. दशरथ देशिंगे यांनी १०० मीटर धावणे, गोळा फेक , लांब उडी, १६०० मीटर धावणे यांची प्रात्यक्षिके व विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला व त्यांचे मैदानी सरावाचे मार्गदर्शन केले व महत्व समजून सांगितले.

द्वितीय सत्रामध्ये प्रमुख वक्ते प्रा. किरण पाटील यांनी संपूर्ण पोलीस व सैन्यदल भरती मार्किंग क्रायटेरिया, सराव, आहार यांचे उत्तम मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे, प्रा. शिर्के, प्रा. होनामाने, प्रा. माने, प्रा. व्ही. ए. पाटील यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यशाळा संयोजनासाठी जिमखाना प्रमुख प्रा. एस.डी. झिटे सर्व प्राध्यापक, अग्रणी महाविद्यालय कमिटी, कर्मचारी वर्ग तसेच आर्थिक सहकार्याबद्दल शिवाजी विद्यापीठ यांचे आभार प्रा. एस्. डी. झिटे यांनी मानून कार्यशाळेचा समारोप केला.

**प्रा. एस्. डी. झिटे**
समन्वयक, जिमखाना कार्यशाळा समिती

## वस्तू व सेवाकर कार्यशाळा अहवाल

सन २०१७–१८ या शैक्षणिक वर्षात अर्थशास्त्र विभागाच्या मार्फत आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज कडेपूर व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आग्रणी महाविद्यालय समुह उपक्रमांतर्गत ''वस्तू आणि सेवाकर (GST)'' या विषयवार शुक्रवार दिनांक २३/०२/२०१८ रोजी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

**प्रा. डी. ए. होनमाने**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

## ग्रंथालय अहवाल

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा मानला जातो. ज्ञानाचे संकलन, संवर्धन व वितरण करण्याचे पवित्र कार्य ग्रंथालय करीत असते. चालू शैक्षणिक वर्ष २०१७–२०१८ मध्ये क्रमिक आणि संदर्भ असे एकूण १२५ ग्रंथ खरेदी केले. त्यांची एकूण किंमत रु. १,२१,१७६/– इतकी आहे. आज अखेर ग्रंथालयात एकूण ११,४४० ग्रंथ असून त्यांची एकूण किंमत रु. ५,३८,१८८/– इतकी आहे. ग्रंथालयात मराठी, इंग्रजी, हिंदी या तिन्ही भाषेतील १६ नियतकालिके तसेच तीन दैनिके नियमितपणे घेतली जातात.

वाचन संस्कृतीमध्ये वाढ होण्यासाठी यावर्षी १२ ऑक्टोंबर २०१७ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. डॉ. कलाम यांचे अनमोल विचार व वाचनाचे फायदे या विषयाची भित्तिपत्रिका आणि चरित्र ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. त्याचे उद्घाटन मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांचे हस्ते करण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्त दि. १७ व १८ जानेवारी रोजी सर्व विषयांच्या संदर्भ ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले.

ग्रंथालयाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यास व ग्रंथालय सुसज्ज करण्यास महाविद्यालयाचे मा. प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांचे आणि ग्रंथालय समिती व प्राध्यापक बंधू–भगिनींचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे. ग्रंथालयाच्या दैनंदिन देवघेवीमध्ये ग्रंथालय परिचर श्री. भोंगाळे डी. एस. यांचे सहकार्य मिळाले.

**प्रा. एन. आर. थोरात**
ग्रंथपाल

## वक्तृत्व स्पर्धा अहवाल

'Forum of Free Enterprises, Mumbai' यांचे मार्फत ५३ वी ए. डी. श्रॉफ यांचे स्मरणार्थ वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बुधवार दि. १३/०९/२०१७ रोजी करण्यात आले होते. त्यापैकी प्रथम क्रमांक जगदाळे उमेश विलास याला रु. १२५०/–, द्वितीय क्रमांक जाधव सुशील बाळासो याला रु. १,०००/–, तर तृतीय क्रमांक कु. थोरात शितल तुकाराम हिला रु. ७५०/– चे पारितोषिक 'Forum of Free Enterprises, Mumbai' या संस्थेकडून मिळालेल्या रु. ३,०००/– रक्कमेतून देण्यात आली.

नेहरु युवा केंद्र संगठन युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रलाय, भारत सरकार यांचे मार्फत आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या स्पर्धेचे नियोजन वाद–विवाद समितीच्या प्रमुख प्रा. सौ. ए. ए. हावळे यांनी केले.

**प्रा. सौ. ए. ए. हावळे**
वक्तृत्व स्पर्धा विभाग प्रमुख

## सांस्कृतिक विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये सांस्कृतिक विभागाने विद्यार्थी–विद्यार्थींनीच्या सुप्त कलागुणांना चालना देण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या शिक्षणमहर्षी डा. बापूजी साळुंखे, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंती व पुण्यतिथीचे औचित्य साधून वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या व्यतिरिक्त गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन ह्याचे देखिल अत्यंत चांगल्या पध्दतीने आयोजन केले व त्याला विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

सांस्कृतिक विभाग हा केवळ एकट्या व्यक्तिने यशस्वी होत नसतो तर त्यामध्ये लाभलेल्या महाविद्यालयातील प्रत्येक घटकाचे व त्यांच्या योगदानाचे मी आभार मानते.

महाविद्यालयाचे प्राचार्य एस्. टी. शिंगटे यांच्या योग्य मार्दर्शनामुळे हा विभाग यशस्वी झाला. या व्यतिरिक्त प्रा. व्यवहारे, प्रा. एस्. पी. खोत, प्रा. एस्. व्ही. डुरे यांच्या कठोर परिश्रमाने सासंकृतिक विभाग उत्कृष्ठ कार्य करु शकला. पुन्हा सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे शतशः आभार.

**प्रा. एस्. वाय. पाटील**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

## जिमखाना विभाग अहवाल

* दिनांक २९/०८/२०१७ रोजी महाविद्यालामध्ये क्रिडा दिन साजरा
* शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय बुध्दीबळ स्पर्धेत दि. ११, १२ व १३ सप्टेंबर २०१७ रोजी देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय चिखली येथे ३ विद्यार्थ्यांचा सहभाग
* शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय कबड्डी स्पर्धेत दि. २९ व ३० ऑक्टोंबर २०१७ विश्वासराव नाईक आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सायन्स कॉलेज शिराळा येथे १० विद्यार्थ्यांचा सहभाग
* शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय मैदानी स्पर्धेत दि. ०६ व ०७ ऑक्टोंबर २०१७ मिरज महाविद्यालय मिरज येथे १० विद्यार्थ्यांचा सहभाग
* शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत दि. २६ व २७ ऑक्टोंबर बाबा नाईक कॉलेज, कोथरुड येथे २ विद्यार्थ्यांचा सहभाग
* शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटरझोनल स्पर्धेत महावीर कॉलेज, कोल्हापूर येथे दि. ३०, ३१ ऑक्टोंबर १ विद्यार्थ्याचा सहभाग
* शिवाजी विद्यापीठ आग्रणी महाविद्यालय दि. २२/०२/२०१८ रोजी एक दिवसीय पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारिरीक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळा महाविद्यालयामध्ये संपन्न
* शिवाजी विद्यापीठ आग्रणी महाविद्यालय दि. २२/०२/२०१८ रोजी एक दिवसीय पोलीस व सैन्यदल भरतीसाठी शारीरिक तयारी व प्रशिक्षण कार्यशाळा महाविद्यालयामध्ये संपन्न.
* स्वामी विवेकानंद सप्ताहानिमित्त दि. १८ जानेवारी ते १९ जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये १०० मी. धावणे, २०० मी. धावणे, ४०० मी. धावणे, लांब उडी, बुध्दीबळ, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, कबड्डी व व्हॉलीबॉल इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या.

**प्रा. झिटे सुरज दत्तात्रय**
जिमखाना प्रमुख